
दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
रविवार, दि. १० मे २०२६



## संपादकीय

# बीसीसीआय आणि खेळाडूंच्या गर्लफ्रेंड्स!

अतिप्रचंड पैसा आणि अमाप लोकप्रियता लाभलेल्या माणसांना कुणी शिस्त आणि सभ्य वर्तनाचे धडे द्यायला लागलंच तर त्याला 'संकेत' यापेक्षा जास्त महत्त्व न देण्याची एक नवीन अलिखित रीत आता सर्वत्रच तयार होते. मग क्रिकेटपटू तरी त्याला अपवाद कसे असतील? आक्रमकपणा देहबोलीतून नाही तर केवळ कामगिरीतून दाखवण्याचा तेंडुलकर-द्रविड काळ आता सरला. आता जो जितका आक्रमक, जितका बडबोला, जितका समाजमाध्यमस्नेही तितका चर्चेत असा एक नवा पायंडा पडत आहे. यावर्षीच्या आयपीएलमध्ये मात्र तो इतका ठळक झाला, की बीसीसीआयला एक मोठी शिस्त नियमावली दहाच्या दहा आयपीएल फ्रँचाइजींना पाठवावी लागली. देवाजीत सैकियांनी खरमरीत पत्र पाठवून 'खबरदार, नियम मोडाल तर परिणाम वाईट होतील', असा खडसावून दमच भरला आहे. नेमकं झालं काय बीसीसीआयला इतकं चिडायला?

काही ठळक कारणं जगजाहीर दिसली. काही बीसीसीआयच्या अॅण्टी करप्शन विभागाने शोधली.. सगळ्यात मोठं कारण?- खेळाडूंच्या 'मैत्रिणींचा' मुक्त वावर ! खेळाडूंनी कुणाला 'डेट' करावं, लग्नाशिवाय एकत्र राहावं, उघडपणे प्रेम व्यक्त करावं हे त्यांचं खासगी जगणं झालं. त्यात ढवळाढवळ करण्याचा हक्क बीसीसीआयला नाही, माध्यमांना आणि चाहत्यांनाही नाही. पण यावेळी मात्र संघांच्या ड्रेसिंग रूमपासून हॉटेल आणि थेट संघ बैठकांपर्यंत कुठेही वावरणाऱ्या 'गर्लफ्रेंड्स' बीसीसीआयच्या 'नजरे'त आल्या. खेळाडू, सपोर्ट स्टाफ, व्यवस्थापकीय सहकारी, संघमालक यांच्या जवळची माणसं सर्वत्र खुलेआम संचार करू लागली. नियम मोडले गेले. नको तिथे नको त्या माणसांची गर्दी वाढू लागल्यावर त्यातून मॅच फिक्सिंग, हनी ट्रॅप, खेळाडूंची सुरक्षितता, बेकायदा आर्थिक व्यवहार या साऱ्याला मोकळं रान मिळेल असं निदर्शनास आल्यानं बीसीसीआयने कडक शिस्तीचा बडगा उगारला. यावर्षीच्या आयपीएलमध्ये तसं खूप काही 'व्हायरल' झालं. राजस्थान रॉयलचा कप्तान रियान पराग वेपिंग करताना दिसला. मॅच सुरू असताना ड्रेसिंग रूममध्ये बसून वेपिंग करतानाचा त्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. वेपिंगवर भारतात बंदी असल्यानं तो गंभीर गुन्हा आहे; पण परागला किरकोळ २५ टक्के फी कपात आणि एक डीमेरिट पॉइण्ट असा दंड झाला. त्याच संघाचा एक व्यवस्थापक स्मार्ट फोन वापरताना दिसला. युजवेंद्र चहल विमान प्रवासात वेपिंग करताना दिसला. अनेक खेळाडूंच्या सोशल मीडिया एन्फ्लुएन्सर असलेल्या गर्लफ्रेंण्ड्स आपापले फॉलोअर्स वाढवण्यासाठी संघ-बैठकांच्या ठिकाणाहून रिल करताना दिसल्या. यंदाच्या आयपीएलमध्ये क्रिकेटची चर्चा कमी आणि क्रिकेटबाह्य गोष्टींची, खेळाडूंच्या वर्तनाचीच चर्चा जास्त सुरू आहे. शिस्तीचं सुटलेलं भान आणि पैशाची मस्ती असलेली देहबोली हे या आयपीएलचं एक अशोभनीय वैशिष्ट्य म्हणायला हवं. एकीकडे अनेक खेळाडूंना दुखापतींनी छळलं, त्यांनी माघार घेतली. दुसरीकडे पाटा खेळपट्ट्यांमुळे बॉलर नावाच्या खेळाडूला काही महत्त्वच उरू नये इतकी त्याची पिटाई झाली. काही अत्यंत एकारलेले रटाळ सामने झाले, क्रिकेटचा थरार कमी झाला. आणि दुसरीकडे काही संघमालकांचं वर्तन, मूड्स, त्यांचं खेळाडूंशी असलेलं वर्तन, ड्रेसिंग रूममध्ये जाऊन खेळाडूंना 'संदेश' देणं, संघातलं राजकारण आणि दुफळ्या हे इतकं उघड झालं की शेवटी टीव्हीवरची प्रेक्षकसंख्या कमी होण्याचं संकट दिसू लागलं. यासाऱ्यात बीसीसीआयने हा शिस्तीचा बडगा उचललेला दिसतो. तो इतका टोकदार आहे की आता यापुढे खेळाडूंना भेटायला कोण कोण येतं याची रितसर लेखी परवानगी संघ व्यवस्थापकाकडून घ्यावी लागेल, एक नोंदवही ठेवून त्यात सगळ्या भेटींचे नाव तारीखवार तपशील लिहावे लागतील. तब्बल दीड महिना चालणारी ही स्पर्धा, १० संघ, १३ ठिकाणी देशभर होणारे सामने हे सारं नियोजन अर्थात सोपं नसतं, एक मोठी यंत्रणा त्यापाठीमागे राबते. महागडी तिकिटं खरेदी करून सामने पहायला येणारी प्रेक्षकसंख्याही मोठी आहे.

## गुरु वचन

### जीवनाचे चार आधार

सुसंस्कारितेचे चार आधार आहेत– समजुतदारपणा, प्रामाणिकपणा, जबाबदारपणा आणि शूरपणा. यांना आध्यात्मिक–आंतरिक वरिष्ठतेच्या दृष्टीत तेवढेच महत्वाचे मानले गेले पाहिजे जेवढे शरीरासाठी अन्न, पाणी, वस्त्र आणि निवारा अनिवार्य समजले जाते. समजुतदारपणाचा अर्थ असा की, दूरदर्शी विवेकशीलता अवलंबिणे. एरवी लोक तात्पुरत्या फायद्यालाच सर्वस्व मानतात. तो मिळविण्यासाठी चुकीचे पाउलही उचलतात. त्यामुळे भविष्य अंधकारमय बनते.

गुन्हेगारी घटक याच मनोवृत्तीचे असतात.दूरदर्शिता, विवेकशीलता अनुभवी शेतकऱ्याच्या कामासारखे आहे. ज्यानुसार शेत नांगरणे, बीज पेरणे, खत पाणी देणे, देखभाल करण्यात सुरूवातीचे नुकसान आणि कष्ट सहन केले जातात. दूरदर्शिता सांगते की, याचे फळ काळानुसार मिळणार आहे.

एका बीजाच्या दाण्याच्या बदल्यात अनेक पट दाणे मिळणार आहेत. संयम आणि सत्कार्य अशीच बुद्धिमत्ता आहे. पुण्य परमार्थात भविष्य उज्वल बनविणारी शक्यता अंतर्भूत असते. संयमाचे फळ वैभव आणि पौरुषाच्या रूपात दृष्टिंगत होणार असते. दूर्बिणच्या आधारे दूरपर्यंतची वस्तु पाहिली जाऊ शकते आणि त्या माहिती आधारे अधिक बुद्धिमत्तापूर्ण निर्णय घेतला जाऊ शकतो. अध्यात्माच्या भाषेत यालाच तृतीय नेत्र खुलणे म्हणतात. त्या आधारे संकटापासून वाचणे आणि उज्वल भविष्याची निर्मिती शक्य आहे.

कथनी–करनी एक ठेवणे यास प्रामाणिकपणा म्हणतात. सहयोग व सद्भाव अर्जित करण्यासाठी प्रामाणिमपणा प्रमुख आधार आहे. याला आपल्या व्यवसायात स्वीकारून अनेक लोकांनी मोठे यश मिळविले आहे. मोठी जबाबदारी उपलब्ध करणे आणि ती पार पाडण्यात प्रामाणिकपणा यश देतो.

सुसंस्कारितेचा तिसरा भाग आहे जबाबदारी. बेजबाबदार उत्तरदायित्वापासून निर्लज्जतापूर्वक इंकार करू शकतात. मात्र जबाबदार लोकांना आपले उत्तरदायित्व नियमबद्धपणे पार पाडता येते. जो आरोग्य सुरक्षित ठेवण्याचा जीवन संपदेचा श्रेष्ठतम सदुपयोग करण्याचा, लोक परलोक उत्कृष्ट बनविण्याची जबाबदारी पार पाडतो, तोच संतोष, यश आरोग्याचा लाभ प्राप्त करू शकतो. चौथा व अंतिम टप्पा आहे– शूरपणा. दैनिक जीवनात अनेकानेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी साहस आवश्यक आहे. अन्यथा गडबडीत योग्य उपाय सुचणार नाही.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १४४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 4 | | | | 2 |
| 4 | | 6 | | 1 | 3 | 9 | | |
| 2 | | | | | | | 6 | |
| 7 | | | | 6 | | | 8 | |
| 8 | | 4 | 1 | 3 | 9 | 5 | | 6 |
| | 6 | | | 5 | | | | 3 |
| | 9 | | | | | | | 5 |
| | | 2 | 3 | 9 | | 8 | | 4 |
| 3 | | | | 2 | | | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १४३ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 2 | 5 | 4 | 1 | 3 | 9 | 6 |
| 9 | 3 | 4 | 8 | 6 | 2 | 1 | 7 | 5 |
| 1 | 5 | 6 | 9 | 7 | 3 | 2 | 4 | 8 |
| 3 | 7 | 8 | 4 | 5 | 6 | 9 | 1 | 2 |
| 4 | 9 | 5 | 2 | 1 | 8 | 7 | 6 | 3 |
| 2 | 6 | 1 | 3 | 9 | 7 | 5 | 8 | 4 |
| 5 | 1 | 9 | 6 | 2 | 4 | 8 | 3 | 7 |
| 6 | 2 | 3 | 7 | 8 | 9 | 4 | 5 | 1 |
| 8 | 4 | 7 | 1 | 3 | 5 | 6 | 2 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२९१ – स्कॉटिश सरदारांनी ईंग्लंडचा राजा एडवर्ड पहिला याचे वर्चस्व स्वीकारले.
- १५०३ – क्रिस्टोफर कोलंबसने केमन द्वीपसमूहाला भेट दिली व त्यांचे नामकरण ला तोर्तुगा असे केले.
- १५३४ – जॉक कार्टियेने न्यू फाउंडलंड भेट दिली.
- १७६८ – न्यू ब्रिटोन या नियतकालिकात राजा जॉर्ज तिसऱ्यावर टीका करणारा लेख लिहिल्याबद्दल जॉन विल्किसला तुरुंगात टाकण्यात आले. लंडनमध्ये दंगे.

### राष्ट्रीय

- १८५७ – पहिला भारतीय स्वातंत्र्य संग्राम सुरू.
- २००६ – महाराष्ट्रातील शिक्षण संस्थात ५० टक्के आरक्षण लागू करण्यात आले.


### जन्म

- १२६५ – फुशिमि, जपानी सम्राटाचा जन्म.
- १८३८ – जॉन विल्क्स बूथ, अब्राहम लिंकनचा मारेकरीचा जन्म.
- १८७८ – गुस्ताव स्ट्रेसमान, जर्मनीचा चान्सेलरचा जन्म.
- १८९७ – आयनार गेर्हार्डसन, नॉर्वेचा पंतप्रधानाचा जन्म.
- १९२७ – नयनतारा सहगल भारतीय लेखिकाचा जन्म.
- १९५५ – मार्क चॅपमन, जॉन लेननचा मारेकरीचा जन्म.
- १९५८ – तौसीफ अहमद, पाकिस्तानी क्रिकेटपटूचा जन्म.
- १९६० – बोनो, आयरिश गायकाचा जन्म.

### निधन

- १०३४ – मियेस्झ्को दुसरा, पोलंडचा राजाचे निधन.
- १४२४ – गो–कामेयामा, जपानी सम्राटचे निधन.
- १४८२ – पाओलो डाल पोझो टोस्कानेली, इटलीचा गणितज्ञ व अंतराळतज्ञाचे निधन.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १४४



**आडवे शब्द**

१. दुसऱ्यावरती अवलंबून राहणे
५. रेशमी धोतर
७. जास्त वयाचा नवरदेव
१०. अस्वल
११. जाळ्यामध्ये प्राण्याला अडकवून शिकार करणारा
१५. परमेश्वर
१७. मुलाची मुलगी
१८. पृथ्वी
२०. धरणाचे पर्जन्यक्षेत्र
२३. बंदी, मज्जाव
२५. चप्पल
२६. खंदक, खोल व लांब खड्डा
२७. हत्ती
२९. वेळ (हिंदी)
३०. निराश
३२. पक्के आश्वासन
३४. परिस्थिती
३६. व्यायाम, सैन्याची परेड
३८. डोंगरावरचा सपाट बाग
४०. सबब, निमित्त
४२. दृष्टी, रोखलेली नजर
४३. आभाळ कोसळल्याची आवई उठवणारा इसापनीतीमधील प्राणी
४४. आपले राष्ट्रीय फूल
४६. बायको
४७. अत्यंत आवडता, प्रिय
४९. एकरूप
५१. कपोल
५२. गाजराचे पक्वान्न
५४. मुस्लिमांची धार्मिक शिक्षण देण्याची शाळा
५६. काकडी इ.चे कोशिंबीरीसारखे तोंडीलावणे
५८. पोळ्या भाजण्याचे साधन
५९. रानटी
६०. दुसऱ्यावर चटकन विश्वास ठेवणारा, भोळा
६१. कागद, कापड कापण्याचे साधन
६२. खास हकीकत
६५. जादूगाराची पिशवी
६७. तमाशातील शृंगारीक गीत
७०. झाडाभोवती बांधलेला कट्टा
७१. तेज, कांती
७३. राजदरबारातील सभासद
७४. कोर्टातील दावा
७६. आवाज, नाद
७७. नकला करणारा
८०. नायक (इंग्रजी)
८१. कडाक्याचे भांडण
८३. सतत नाही म्हणणे
८६. अत्यंत दुष्ट मनुष्य
८७. खोटे बोलणारा
८८. अत्यंत थोडे प्रमाण, अंगठा व तर्जनी यातील किमान अंतर

**उभे शब्द**

१. कसोटी
२. ढीग
३. रावणाचे एक संबोधन
४. फायदा
५. कमी करणे
६. किंमत
८. एक छोटे चर्मवाद्य
९. तुरडाळीचे गरगट
१२. सेनापती
१३. धैर्य
१४. पादत्राण, खेचर
१९. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
२०. पाणी भरण्याची जागा
२१. डोळे
२२. लग्न इ. विविध करण्याची जागा
२३. माझे
२४. गणपतीचे एक नाव
२८. विष
२९. मनाला टोचणारे दु:ख
३१. रात्र
३३. उसाचा रस काढण्याचे साधन
३५. किराणा माल
३७. मार्गक्रमण
३८. नजर चुकवून हळूच पळालेला
३९. दरी
४१. एक अप्सरा
४३. एकाच काळातील
४५. सुसर
४६. गुणाकारच्या विरुद्ध
४८. दाद, प्रशंसोद्गार
५०. सपाट
५३. मंगलवाद्ये
५५. मांसाहार
५७. डग्ग्याच्या जोडीचे वाद्य
६१. चकणी
६३. म्हैस
६४. अखेर, नाश
६५. लहान मुलांची संख्या जास्त असलेले घर
६६. अंकुर
६८. लग्गा
६९. सूर्यापासून प्राप्त
७०. तपासणे, परीक्षा घेणे
७२. अंतराळात प्रवास करणारे वाहन
७३. मंत्रीमंडळ
७४. अगदी सत्य
७५. किंचित लाल रंगाचा
७८. ज्वारीचे वाळलेले खुंट
७९. कर्ण
८२. गोष्ट, कहाणी
८४. छोटी घंटा
८५. जप्ती

**जम्बो शब्दकोडे क्र. १४३ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.कलागत ४.सभागार ७.तिलोत्तमा ११.रजत १३.शाळा १४.हुतात्मा १५.क्षमा १७.वीरगती १९.कसरत २०.सावज २२.जयजवान २५.मोद २८.वारा २९.वचक ३१.क्षपणक ३४.आजकल ३५.वरदा ३७.रद ३८.दमट ४०.सरतेशेवटी ४३.तारस्वर ४४.पादुका ४६.वानर ४७.रमावर ५०.आड ५१.नख ५४.काका ५५.पागलखाना ५९.परवचा ६२.वखार ६४.दरसाल ६५.खटमल ६६.दानवीर ६८.यक्ष ६९.दादा ७०.वासर ७१.स्तवन ७३.लघळभवानी ७७.कळ ७८.खासदार ८०.कान ८१.मदनबाण ८४.वारसदार ८५.मसलत ८६.काव

उभे उत्तर : १.कटाक्ष २.गर ३.तजवीज ५.भारतीय ६.रवाखवा ७.काळा ८.लोकसत्ताक ९.माहुत १०.आत्मा १२.तर १६.मासा १८.गजरा २१.वहाण २३.जयजयकार २४.नवल २६.दमदाटी २७.साक्षरता ३०.पावशेर ३२.पदरमोड ३३.कदरदान ३६.रव ३९.टपाल ४१.रवा ४२.तेनसिंग ४५.कावकाव ४८.माका ४९.सखा ५०.आपादमस्तक ५२.खप ५३.चावट ५५.पार ५६.लहानसहान ५७.नागर ५८.रसायन ६०.रखवालदार ६१.चामखीळ ६३.खानदानी ६४अ.लक्ष ६६.दावा ६७.वीर ६९.दावानल ७२.वळवा ७४.भकास ७६.कणव ७८.खास ७९.सदा ८२.दशा ८३.बाका

## उपदेशकथा

### महापुरुष

आधुनिक संत म्हणून ज्यांना संबोधण्यात येते ते आचार्य विनोबा भावे यांच्या संदर्भातील एक गोष्ट अशी की, आपले म्हणणे दुसऱ्यांना न दुखवता मोठ्या खुबीने आचरणाने पटवून देण्यात त्यांचा हातखंडा होता. एके दिवशी असाच एक माणूस त्यांच्याकडे आला व पश्चात्तापदग्ध होऊन म्हणाला, महाराज दारु काही मला सोडायलाच तयार नाही. मला माहिती आहे की ती सवय वाईट आहे. मला ती सवय सोडायची आहे पण काय करु ? आचार्य शांतपणे म्हणाले, असे कर, तू उद्या मला याचवेळी येऊन भेट व बाहेरुनच हाक मार. मी मग येऊन सांगेन काय ते ! दुसऱ्या दिवशी तो माणूस ठरल्याप्रमाणे आला पण त्याला कळेना की बाहेरुनच का हाक मारायची ? पण आचार्यांची आज्ञा म्हणून अधिक विचार न करता त्याने बाहेरुनच हाक मारुन स्वत: आल्याचे सांगितले. तोच आतून आचार्यांचा आवाज आला, होय रे, मी बाहेर येऊ पाहतोय, पण हा खांबच मला सोडायला तयार नाही. तो माणूस चक्रावून गेला. ही काय भानगड आहे ? आचार्य माझी गंमत तर करत नाहीत ? असा विचार करुन त्यांनी आत कुतूहलाने डोकावून पाहिले. तो त्याला हसूच आवरेना. घरातील खांबाला विनोबाजी घट्ट पकडून बसले होते व तो खांब मला सोडत नाही म्हणून तक्रार करत होते. तो माणूस हात जोडून म्हणाला, विनोबाजी आपणच खांबावर चढून त्याला धरले आहे व तो खांब सोडत नाही, हे कसे ? हे ऐकूण स्मितहास्य करत खाली उतरले व त्याला समजावणीच्या स्वरात म्हणाले, ज्याप्रमाणे मी या खांबाला धरुन ठेवले होते तसेच तू ही दारुला पकडून ठेवले आहेस. दारुने तुला नाही पकडले. जेव्हा तू दारु सोडायचे ठरवशील तेव्हा आपोआप दारु पिच्छा सोडेल. हे ऐकून त्या माणसाचे डोळे उघडले व त्यांनी विनोबाजींच्या पायावर डोके ठेवून दारु सोडण्याचा निश्चय केला.

## : SMS :

1 Indian Japan main cooking k muqable mein khali pateeli mai chamcha chala raha tha
Japani: Kya bana rahy ho?
Indian: CHOOTIA.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७ | २६.३ |
| अहमदनगर | ३६.१ | २५.६ |
| अकोला | ४१.६ | २८.९ |
| अमरावती | ४०.७ | २६.८ |
| बीड | ४२.३ | २९.७ |
| भंडारा | ४०.७ | २५.३ |
| बुलढाणा | ३४.२ | २१ |
| चंद्रपूर | ४२.१ | २९.२ |
| चेन्नई | ३९.९ | ३२.६ |
| नवी दिल्ली | ३४.३ | २२.४ |
| धुळे | ४०.३ | ३०.१ |
| गोंदिया | ३९.३ | २४.९ |
| जळगाव | ४२.३ | २९.७ |
| कोल्हापूर | ३७.७ | २५.५ |
| लातूर | ३७.४ | २५.१ |
| मुंबई | ४१.३ | ३५.४ |
| नागपूर | ४०.४ | २५.५ |
| नांदेड | ४०.७ | २८.५ |
| नंदूरबार | ३९.१ | २८.३ |
| नाशिक | ३७.५ | २५.४ |
| पुणे | ३४.९ | २५ |
| पंढरपूर | ३९.८ | २६.२ |
| सातारा | ३७.९ | २३.२ |
| सांगली | ३९.१ | २५.१ |
| सोलापूर | ३९.८ | २६.३ |
| वर्धा | ४१.३ | २६.६ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** मानसिक प्रसन्नता लाभेल. मन आनंदी व आशावादी राहील. व्यवसायात आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील.

**वृषभ :** उत्साह वाढेल. प्रवास सुखकारक होतील. वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. नाट्य क्षेत्रातील व्यक्तींना विशेष संधी लाभेल.

**मिथून :** आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात नवीन हितसंबंध निर्माण करू शकाल. शासकीय कामाशी संबंधित व्यक्तींना विशेष यश मिळेल.

**कर्क :** उत्साह वाढेल. प्रसन्नता वाढेल. गुंतवणुकीसाठी दिवस चांगला आहे, प्रयत्न करावयास हरकत नाही. प्रवास सुखकर होतील.

**सिंह :** वैवाहिक जीवनात मतभेदाची शक्यता आहे. संततीसौख्य लाभेल. तुमचे निर्णय योग्य ठरतील. मनोबल व उत्साह वाढेल.

**कन्या :** प्रवासाचे योग येतील. घरी पाहुणे येण्याची शक्यता आहे. नातेवाईकांचे विशेष सहकार्य लाभेल. प्रकृतीकडे दुर्लक्ष नको. व्यवसायात अडचणी जाणवतील.

**तूळ :** कला, संगीत, नाट्यक्षेत्रातील व्यक्तींना विशेष लक्ष मिळेल. काहींची आध्यात्मिक क्षेत्रात प्रगती होईल. खर्च वाढतील.

**वृश्चिक :** कर्क : आर्थिक क्षेत्राच्या दृष्टीने दिवस चांगला आहे. आर्थिक लाभ मोठ्या प्रमाणावर होतील. उधारी उसनवारी वसूल होईल.

**धनू :** काहींना अचानक धनलाभाची शक्यता आहे. महत्त्वाचे निर्णय नकोत. मुलामुलींसंदर्भात एखादी त्रासदायक घटना घडेल.

**मकर :** उत्साह व उमेद वाढेल. कर्तृत्वाला संधी मिळेल. जिद्द, चिकाटी व मनोबल यांच्या आधारे अडचणींवर मात कराल. नातेवाईकांचे विशेष सहकार्य लाभेल.

**कुंभ :** कला, संगीत, नाट्यक्षेत्रातील व्यक्तींना विशेष संधी मिळेल. मनोरंजनाकडे कल वाढेल. मनोबल व आत्मविश्वास वाढेल. प्रवास शक्यतो टाळावेत.

**मीन :** आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे. काही व्यक्ती व्यसनाधिनतेच्या आहारी जाण्याची शक्यता आहे. प्रिय व्यक्तींसाठी विशेष खर्च कराल.

## पंचांग



| | |
|---|---|
| विक्रम संवत्– २०८२ | ऋतु– सौर ग्रीष्म |
| वैशाख शके | कृष्ण पक्ष |
| संवत्– १९४८ | तिथि:अष्टमी १५:०६:४८ |
| संवत्सर –पराभवनाम | नक्षत्र:धनिष्ठा |
| अयन– उत्तरायणारंभ | २४:४९:४९+ |
| मास– वैशाख | योग:ब्रह्म २६:०८:२५+ |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. १० मे २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १३४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये




# पोस्ट विभाग हा भारतीय व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : 'जन सेवा कनेक्ट' उपक्रमांतर्गत अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज पोस्ट ऑफिस जनतेच्या सेवेत दाखल

**मुंबई (दै. संध्या)**




गरीब-श्रीमंत, जात-धर्म न पाहता पोस्ट विभागाची सेवा देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेली आहे. कारगिल युद्धाच्या काळातही वीर जवानांचे संदेश त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचविणारे पोस्टमन हे मानवी संवेदनांचे वाहक ठरले. पोस्ट विभाग हा केवळ सेवा देणारा विभाग नसून भारतीय सांस्कृतिक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दळणवळण तसेच ईशान्य क्षेत्र विकास मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते मुंबईतील अंधेरी रेल्वे स्थानक परिसरातील नूतनीकरण करण्यात आलेल्या अत्याधुनिक पोस्ट ऑफिसचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी आमदार अमित साटम, आमदार हारून खान, महाराष्ट्र-गोवा सर्कलचे मुख्य पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंह तसेच पोस्टमास्तर जनरल के. अरोरा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'वारसा आणि विकास' या विचारातून पोस्ट विभागाने आधार सेवा, बँकिंग सेवा, ऑटोमॅटिक पार्सल सेवा यांसारख्या आधुनिक सेवांचा स्वीकार केला आहे. इंटरनेट, एसएमएस आणि ई-मेलसारख्या आधुनिक संदेशवहन साधनांमुळे पोस्ट विभागासमोर आव्हाने निर्माण झाली. खासगी कुरिअर सेवांमुळे स्पर्धाही वाढली. मात्र प्रधानमंत्री मोदी यांच्या दूरदृष्टीतून पोस्ट विभागाच्या सामर्थ्याला नवी दिशा मिळाली. पोस्ट बँकसारख्या सेवांमुळे विभागाने मोठे परिवर्तन साधले असून या परिवर्तनात केंद्रीय मंत्री शिंदे यांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे.

पोस्ट विभागाने महसुलातील वाढीचा दर अडीच टक्क्यांवरून यंदा १६ टक्क्यांपर्यंत नेला असून नव्या स्वरूपात जनतेच्या सेवेत दाखल होताना अनेक नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. पोस्टमन आणि पोस्ट विभागाचे समाजजीवनातील महत्त्व मराठीतील पु. ल. देशपांडे तसेच हिंदी लेखक शरद जोशी यांच्या साहित्यामधूनही अधोरेखित झाले असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सामान्य माणसासाठी पोस्ट विभागाने मोठी कामगिरी बजावली असल्याचेही त्यांनी नमूद केले. राज्यात 'जनसेवा कनेक्ट'च्या माध्यमातून २२०० पोस्ट ऑफिस सुरू करण्यात येत असून त्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांचे त्यांनी आभार मानले.

केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले की, गाव असो वा शहर, प्रत्येक कुटुंबाच्या मनामध्ये पोस्टमनबद्दल विशेष आत्मीयता आहे. देशातील दीड लाख पोस्ट कार्यालयांमार्फत सेवा देताना पोस्ट विभागाने सर्वसामान्यांच्या सेवेला अग्रक्रम दिला आहे. पोस्ट लाईफ इन्शुरन्समध्ये दीड कोटी खाती आणि जवळपास दोन लाख कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या असून पोस्ट बँकेत ४० कोटी खाती उघडण्यात आली आहेत. या माध्यमातून पोस्ट विभागाने जनतेचा मोठा विश्वास संपादन केला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील ऐतिहासिक वारसा जपत पोस्ट विभागाचे आधुनिकीकरण करण्यात आले असल्याचे सांगताना केंद्रीय मंत्री शिंदे यांनी २००७ साली राज्यमंत्री असताना पोस्टमनच्या मुलांना केंद्रीय विद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न केल्याची आठवण सांगितली. 'नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिस' संकल्पनेतून देशभरात सुमारे १०० पोस्ट ऑफिस सुरू करण्यात आले असून कॅफे, वाय-फाय, इंटरनेट, आरएफआयडी, आधार सुविधा अशा विविध सेवा येथे उपलब्ध करण्यात आल्या आहेत. 'जनसेवा कनेक्ट' उपक्रमांतर्गत देशभरात २५ हजार पोस्ट ऑफिस सुरू करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

# विकास लवांडेंवर शाईफेक; वारकरी संप्रदायावर टीका केल्याने नाराजी

**पुणे (दै. संध्या)**



विकास लवांडे यांच्यावर काळी शाई फेकून धक्काबुक्की करण्यात आल्याची गंभीर घटना पुणे जिल्ह्यात घडली आहे. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, लवांडे यांनी थेट संग्राम महाराज भंडारे आणि त्यांच्या समर्थकांवर हल्ल्याचा आरोप केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हवेली तालुक्यातील आळंदी मातोबा येथे कार्यक्रम आणि प्रवचन आटोपल्यानंतर विकास लवांडे परतत होते. आज सकाळी सुमारे दहाच्या सुमारास काही जणांनी त्यांच्या गाडीचा पाठलाग करून वाहन अडवले. त्यानंतर त्यांच्या अंगावर काळी शाई फेकण्यात आली तसेच धक्काबुक्की करण्यात आल्याचा आरोप लवांडे यांनी केला आहे. विकास लवांडेंवरील शाईफेकीचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या व्हायरल व्हिडिओत संग्राम महाराज भंडारे आणि त्यांच्या समर्थकांनी शाईफेक केल्याचे दिसते. 'वारकरी संप्रदायावर टीका करताना विकास लवांडेंनी घुसखोर असा शब्द वापरला होता. गुरुवर्यांसाठी अशा शब्दांचा वापर केला पाहिजे नव्हता', असे संग्राम महाराज भंडारेंनी म्हटले आहे. याबाबत माहिती देताना लवांडे म्हणाले की, "वारकऱ्यांमधील नथुराम गोडसे असलेले गुंड संग्राम भंडारे आणि त्यांच्यासोबत आलेले १० ते १५ गोरक्षक गुंड तीन चारचाकी वाहनांमधून आले होते. त्यांनी माझी गाडी अडवून माझ्यावर शाई फेकली, धक्काबुक्की केली आणि पिस्तूल दाखवून धमकावले. त्यानंतर ते घटनास्थळावरून पळून गेले." घटनेनंतर विकास लवांडे तातडीने लोणी काळभोर पोलीस ठाणे येथे दाखल झाले. त्यांनी या प्रकरणी फिर्याद देण्यासाठी पोलीस ठाण्यात धाव घेतली असून, आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




# विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्यांवर कारवाई होणार : जयकुमार रावल

**मुंबई (दै. संध्या)**



राज्यात शेतकऱ्यांच्या व्यापक हिताचे संरक्षण आणि कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवहाराचे नियमन करण्यात येते. मात्र राज्यातील काही भागांत अनेक व्यापारी, संस्था तसेच काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी-विक्री करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. पणन संचालनालयाने यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून, संबंधितांना वेळोवेळी सूचना देऊनही काही व्यापारी व संस्था विनापरवाना व्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता कायद्यानुसार आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. शासनाने दि. ५ जुलै २०१६ आणि दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या सुधारित तरतुदींनुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापारासाठी आवश्यक परवाना घेणे बंधनकारक केले आहे. बाजार समितीकडून संबंधित परवाना धारकांकडून बाजार शुल्क आकारले जाणार नसले तरी कायद्यानुसार परवाना घेणे आवश्यक राहणार आहे. कायद्यातील कलम ५ (ड) अंतर्गत थेट पणन, खाजगी बाजार, शेतकरी-ग्राहक बाजार तसेच ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्मसाठी परवाना देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे व्यापारी, संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच इतर संबंधित घटकांनी आवश्यक परवानगीशिवाय शेतमाल व्यापार करू नये, अन्यथा त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिला आहे.

# ईएसआयसी रुग्णालये उभारण्याचा प्रयत्न : आकाश फुंडकर

## *नवीन कामगार संहितेनुसार ४० वर्षांवरील कामगारांसाठीच्या वार्षिक आरोग्य तपासणी शिबिराचा राज्यात शुभारंभ*

**पुणे (दै. संध्या)**




राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये औद्योगिक क्षेत्राचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असून, त्या सर्व ठिकाणी कर्मचारी राज्य विमा निगमाची (ईएसआयसी) रुग्णालये उभारण्याचा शासनाचा प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी केले.

पुण्यातील बिबवेवाडी येथील ईएसआयसी रुग्णालय येथे नवीन कामगार संहितेनुसार 40 वर्षांवरील कामगारांसाठीच्या वार्षिक आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह कर्मचारी राज्य विमा योजना आयुक्त रमेश चव्हाण, इतर वरीष्ठ अधिकारी, तसेच कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन कामगार कायद्यांतर्गत प्रस्तावित केल्यानुसार, ४० वर्षे आणि त्यावरील वयोगटातील कामगारांसाठीचा हा देशव्यापी वार्षिक आरोग्य तपासणी उपक्रमाचा शुभारंभ आज कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, बसैदारापूर, नवी दिल्ली येथे केंद्रीय कामगार आणि रोजगार तसेच युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या हस्ते करण्यात आला. याच वेळी देशातील इतर ११ ESIC रुग्णालयांमध्येही सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यामध्ये पुण्यातील ESIC रुग्णालयाचाही समावेश आहे.

पुण्यात आयोजित कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले कामगार मंत्री आकाश फुंडकर आपल्या भाषणामध्ये म्हणाले की, कामगारांना कोणताही आजार उद्भवण्यापूर्वीच त्यांची आरोग्य तपासणी करणे हा सरकारचा मानस आहे. नियमित तपासणीमुळे गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन कामगारांना मोठ्या आरोग्य धोक्यांपासून वाचवता येईल. सध्या राज्यात औद्योगिकीकरण वाढत असून कामगारांची संख्याही मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. अशा स्थितीत ईएसआयसी रुग्णालयांची गरज भासणार असून केंद्र सरकारसोबत यासंदर्भात सल्लामसलत करून रुग्णालयांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असेही कामगार मंत्री फुंडकर यांनी सांगितले.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी औद्योगिक अपघातांमध्ये जखमी होणाऱ्या कामगारांना तत्काळ उपचार मिळण्याच्या दृष्टीने खासगी रुग्णालये आणि डॉक्टरांची मदत घेण्याबाबत सकारात्मक विचार करण्याची गरज व्यक्त केली. अनेक खासगी रुग्णालये आणि डॉक्टर ही सेवा मोफत देण्यास तयार आहेत, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

## ब्रेकिंग न्यूज

### विजय राज्यपालांच्या भेटीसाठी

मुंबई (दै. संध्या) : तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या निकालाच्या सहाव्या दिवशी, अभिनेता विजयसाठी सरकार स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तीन दिवसांच्या विलंबानंतर निवडणुकीत दोन जागा जिंकलेल्या व्हीसीकेने (VCK) विजय यांच्या टीव्हीके (TVK) पक्षाला आपले पाठिंब्याचे पत्र सादर केले आहे. व्हीसीकेचे अध्यक्ष थोल थिरुमावलवन यांनी टीव्हीके नेते अधव अर्जुन यांना पाठिंब्याचे पत्र सुपूर्द केल्याचा एक फोटोही समोर आला आहे. विजयच्या टीव्हीके पक्षाला यापूर्वी ११६ आमदारांचा पाठिंबा होता. व्हीसीकेचा पाठिंबा मिळाल्यानंतर हा आकडा बहुमताच्या आकड्यापेक्षा एकने वाढून ११९ झाला आहे. दरम्यान, घोडेबाजाराच्या भीतीमुळे काँग्रेसने आपले पाच आमदार हैदराबादला पाठवले आहेत. पक्षाच्या सूत्रांनुसार, मेलूरचे आमदार पी. विश्वनाथन हे आमदारांच्या या गटाचे नेतृत्व करत आहेत. सूत्रांनी असेही संकेत दिले आहेत की, टीव्हीकेचे सरकार स्थापन झाल्यास पी. विश्वनाथन यांना मंत्री म्हणून नियुक्त केले जाऊ शकते. २३४-सदस्यीय विधानसभेत टीव्हीकेने १०८ जागा जिंकल्या, त्यापैकी विजय यांनी दोन जागा मिळवल्या.

## बुरखा, नकाब बाळगणे गुन्हा नाही, हा सुशिक्षित मुस्लिमांना त्रास देण्यासाठी कट

# TCS प्रकरण MIM सोबत जोडणे चुकीचे : ओवेसी

**छ. संभाजीनगर (दै. संध्या)**



नाशिकच्या कथित धर्मांतर प्रकरणातील आरोपी निदा खान हिच्या अटकेनंतर निर्माण झालेल्या वादावर एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आज छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी या प्रकरणातील कायदेशीर त्रुटींवर बोट ठेवले आणि तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. TCS प्रकरणाला MIM पक्षाशी जोडणे चुकीचे आहे. मुस्लीम समाजातील सुशिक्षित मुलामुलींना त्रास देण्यासाठी हा सगळा कट असल्याचा आरोप असदुद्दीन ओवेसी यांनी केला.

असदुद्दीन ओवेसी म्हणाले, "निदा खान हिचा एचआर विभागाशी कोणताही संबंध नव्हता, असे टीसीएसच्या निवेदनात सांगण्यात आले आहे. टीसीएस प्रकरणात ९ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. त्यातील एका एफआयआरमध्ये निदा खान हिच्यावर धार्मिक भावना दुखावण्याचा आरोप करण्यात आला. एफआयआर होण्यापूर्वीच तिची दुसरीकडे बदली झाली होती. या प्रकरणातील तक्रारदार हा सत्ताधारी राजकीय पक्षाशी संबंधित आहे. सध्या या प्रकरणात कोणतेही निकाल देऊ शकत नाही." एफआयआरमध्ये निदा खानच्या घरातून बुरखा, नकाब आणि पैगंबर मोहम्मद यांचे पुस्तक जप्त केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

यावर ओवेसी यांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले, "या सगळ्या वस्तू आक्षेपार्ह कधीपासून झाल्या,? कुणी आपल्या धर्माचे पुस्तक बाळगत असेल, तर ते बेकायदेशीर कसे ठरू शकते? केवळ द्वेषापोटी आणि सुशिक्षित मुस्लीम मुलामुलींना त्रास देण्यासाठी हे सर्व प्रयत्न केले जात आहेत."

"दिल्लीत यापूर्वी अशाच प्रकारे मिर्झा गालिब यांचे पुस्तक सापडल्यावरून मुस्लीम तरुणांना दहशतवादी ठरवण्यात आले होते, जे पुढे कोर्टाने फेटाळून लावले. निदा खान प्रकरणातही न्यायालयावर आमचा पूर्ण विश्वास असून तिची निर्दोष मुक्तता होईल," असा विश्वास ओवेसी यांनी व्यक्त केला.

या प्रकरणातील वृत्तांकनावर ओवेसी यांनी कडक शब्दांत ताशेरे ओढले. "काही लोकांकडून या प्रकरणाची मीडिया ट्रायल सुरू आहे. जर मीडियाच न्यायाधीशांचे काम करू लागला, तर ते लोकशाहीसाठी भयावह आहे. जोपर्यंत न्यायालयात आरोप सिद्ध होत नाहीत, तोपर्यंत कुणालाही दोषी ठरवणे चुकीचे आहे. या प्रकरणातील तक्रारदार हा सत्ताधारी राजकीय पक्षाशी संबंधित आहे, हे विसरून चालणार नाही," असेही त्यांनी नमूद केले. नगरसेवक मतीन पटेल यांच्यावर होत असलेल्या आरोपांबाबत विचारले असता ओवेसी म्हणाले, "तो मुलगा कोर्टात या प्रकरणाचा सामना करेल. त्याला जे काही बोलायचे आहे, ते तो न्यायालयासमोर मांडेल. यात परेशान होण्यासारखे काहीही नाही. कायदा आपले काम करेल."

नाशिकच्या टीसीएस कंपनीतील कथित धर्मांतर प्रकरणाने आता राजकीय वळण घेतले असून, सत्ताधारी आणि एमआयएम (MIM) यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे.

"हे प्रकरण केवळ निदा खानपुरते मर्यादित नसून, यात धर्मांतर, लव्ह जिहाद आणि ड्रग्जचा व्यापार असे मोठे रॅकेट सक्रिय असण्याची शक्यता असल्याचा खळबळजनक दावा शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी केला आहे. एमआयएमचा नगरसेवक मतीन पटेलला वाचवण्यासाठी ओवैसींची धडपड असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी 'एसआयटी' स्थापन करण्याची मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचेही त्यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

# भीषण घटनेत ३ ठार, १ बेपत्ता; देवदर्शनाहून परतणाऱ्या पत्नी-पत्नीचा जागीच मृत्यू

**परभणी (दै. संध्या)**



मराठवाड्यातील दोन जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या अपघाताच्या घटना घडल्या आहेत. परभणी आणि लातूर जिल्ह्यातील या अपघाताच्या घटनेत एकूण तीन ठार झाले असून एक बेपत्ता असल्याची माहिती आहे. जिल्ह्याच्या मानवत तालुक्यातील यशवाडी शिवारात एसटी बस आणि दुचाकीच्या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. मानवतमधील अपघाताची ही दुर्दैवी घटना घडली असतानाच, लातूरमध्ये अपघातात एकजण ठार झाल्याचे समोर आलं आहे. येथे कारने दुचाकीवरील दोघांना उडवल्याने एक ठार तर एक बेपत्ता झाल्याची माहिती आहे. अहमदपूर-अंबाजोगाई रोडवरील ह्या विचित्र अपघातानंतर बेपत्ता व्यक्तीचा लोकांकडून शोध घेतला जात आहे.

परभणीच्या मानवत तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग 61 वर यशवाडी शिवारात एसटी बस आणि दुचाकीमध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला असून या अपघाताने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत दाम्पत्य हे जालना जिल्ह्याच्या परतूर तालुक्यातील खांडवीवाडी येथील रहिवासी होते. ते यशवाडी येथे देवदर्शनासाठी आले होते. दर्शन आटोपून परत जात असताना त्यांच्या दुचाकीला समोरून येणाऱ्या एसटी बसची जोरदार धडक बसली. अपघात इतका भीषण होता की दोघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच मानवत पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आहे. दरम्यान, अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.मृतांची ओळख पटविण्याचे व पुढील कार्यवाहीचे काम सुरू आहे. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर शहरापासून सुमारे सात किलोमीटर अंतरावर असलेल्या काजळ हिप्परगा गावाजवळ आज भीषण अपघात झाला. अहमदपूरकडून अंबाजोगाईकडे जाणाऱ्या ब्रेझा कारने समोरून येणाऱ्या मोटरसायकलला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. कार चालकाने आपली बाजू सोडून रॉंग साईडने जात मोटरसायकलला धडक दिली. धडक इतकी भीषण होती की मोटरसायकल चालक तब्बल 50 ते 60 फूट दूर फेकला गेला असून दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. तर, मोटरसायकलवर मागे बसलेली व्यक्ती अपघातानंतर बेपत्ता झाल्याचे सांगितले जात असून तिचा शोध सुरू आहे.

# नदी, पर्यावरण संवर्धनात तरुणांचा पुढाकार व सहभाग महत्वपूर्ण

## सतेज पाटील यांचे मत; ‘व्हाईट टी-शर्ट रिव्होल्यूशन’तर्फे नदी स्वच्छता अभियानात पुणेकरांचा उत्स्फूर्त सहभाग



**पुणे (दै. संध्या) :**

शहरातून वाहणारी मुळा-मुठा नदी पुण्याची जीवनदायिनी आहे. मात्र, आज ती मरणासन्न अवस्थेत आहे. येणाऱ्या पिढीला स्वच्छ पाणी, शुद्ध हवा व प्रदूषणमुक्त शहर द्यायचे असेल, तर नदी, पर्यावरण संवर्धनात तरुणांचा पुढाकार महत्वाचा आहे. पुणेकरांनी लोकसभागातून आपल्या मुळा-मुठेला प्रवाहित ठेवण्यासाठी पुढे यायला हवे," असे मत माजी मंत्री आमदार सतेज पाटील यांनी केले.

शहरातील नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनासाठी ‘व्हाईट टी-शर्ट रिव्होल्यूशन’तर्फे आयोजित नदी स्वच्छता अभियानावेळी सतेज पाटील बोलत होते. भिडे पुलानजीक मुठा नदी पात्रात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. शहरातील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, पुणेकर नागरिक मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

या स्वच्छता अभियानात माजी मंत्री यशोमती ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अभय छाजेड, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, माजी महापौर प्रशांत जगताप, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव श्रीनिवास बी. व्ही., नगरसेविका अल्पना वर्पे, प्रदेश युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष कुणाल राऊत, संयोजक व ‘व्हाईट टी-शर्ट रिव्होल्यूशन’चे प्रमुख ऋत्विक धनवट आदी उपस्थित होते.

यशोमती ठाकूर म्हणाल्या, "केंद्र सरकार 'नमामि गंगे'सारख्या योजनेवर करोडो रुपये खर्च करते. मात्र, नद्यांची अवस्था बिकट आहे. आपल्या नद्या स्वच्छ ठेवायच्या असतील, तर लोकसहभाग आणि विशेषतः तरुणांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. भावी पिढीला निरोगी आणि चांगले जीवन जगता यावे, यासाठी नद्यांचे पावित्र्य जपायला हवे. पर्यावरण संवर्धनासाठी केवळ चर्चा नको, तर प्रत्यक्ष कृती व्हावी." ग्रीन पाथ रिव्होल्यूशन, टुनवाल मोटर्स, ग्रँट मेडिकल फाउंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, आदर पूनावाला क्लीन सिटी इनिशिएटिव्ह, गुडनोट मीडिया, पुणे हवामान योद्धा आदी संस्थांनी यामध्ये सहभाग नोंदवला. आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, एआयएसएसएमएस अभियांत्रिकी महाविद्यालय शिवाजीनगर येथील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

'नदीला शब्दांची नाही, कृतीची गरज आहे', 'नदी पुन्हा हसावी, यासाठी कारणीभूत बना' या संदेशांद्वारे नदी संवर्धनासाठी प्रत्यक्ष कृतीची गरज अधोरेखित करण्यात आली. या मोहिमेदरम्यान नदीकाठ परिसराची स्वच्छता करण्यात आली. सहभागी नागरिकांनी प्लास्टिक आणि इतर कचरा गोळा करत पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. उपक्रमात सहभागीना प्रमाणपत्र आणि टी-शर्ट देण्यात आले.

> शहराच्या शाश्वत विकासासाठी आमची संस्था कार्यरत राहणार आहे. नदी स्वच्छता, प्लास्टिकमुक्त परिसर, प्रदूषण नियंत्रण असे उपक्रम हाती घेण्यात आले असून, पुण्याची जीवनवाहिनी असलेल्या मुठा नदीची स्वच्छता आणि संवर्धन ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. तरुणांना उत्स्फूर्त सहभाग सुखावणारा आहे.
>
> **- ऋत्विक धनवट, प्रमुख, व्हाईट टी-शर्ट रिव्होल्यूशन**

# पानी हो तो क्लिअर : क्लिअर प्रीमियम वॉटरने लॉंच केले कॅम्पेन




**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

भारतात डुप्लिकेट वस्तूंचा बाजार अनेक वर्षांपासून सातत्याने वाढत आहे. कोलाबा कॉजवेपासून चांदणी चौकसारख्या मोठ्या बाजारांपर्यंत स्नीकर्स, सनग्लासेस आणि हँडबॅग्ससारख्या वस्तूंच्या नकला सहजपणे पाहायला मिळतात. आता हाच ट्रेंड अधिक चिंताजनकरीत्या पिण्याच्या पाण्याच्या क्षेत्रातही दिसू लागला आहे, जिथे लुकअलाइक बाटलीबंद पाण्याचे ब्रँड ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण करत आहेत. याच पार्श्वभूमीवर क्लिअर प्रीमियम वॉटरने आपले आतापर्यंतचे सर्वात डिसरप्टिव कॅम्पेन लॉंच केले आहे. ‘पानी हो तो क्लिअर’ या नावाच्या या कॅम्पेनमध्ये ब्रँड ॲम्बेसेडर हृतिक रोशनची लोकप्रियता आणि त्याच्या सिनेमॅटिक लेगसीचा प्रभावीपणे वापर करून स्पष्ट आणि ठोस संदेश देण्यात आला आहे.

सात अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा अधिक मूल्य असलेल्या आणि डबल डिजिट वाढ दराने पुढे जाणाऱ्या बाटलीबंद पाण्याच्या बाजारात गेल्या काही वर्षांत लुकअलाइक ब्रँड्सचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. क्लिअर प्रीमियम वॉटरच्या मते, हा मुद्दा आता फक्त मार्केटिंग किंवा ब्रँडिंगपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो ग्राहकांच्या आरोग्य आणि विश्वासाशी थेट संबंधित झाला आहे. त्यामुळे कंपनीने या विषयावर उघडपणे आवाज उठवण्याचा निर्णय घेतला आहे. कॅम्पेनबाबत हृतिक रोशन म्हणाला कि गेल्या तीन वर्षांपासून मी क्लिअरच्या गुणवत्तेबद्दलच्या बांधिलकीचा साक्षीदार आहे. ग्राहकांपर्यंत सुरक्षित पिण्याचे पाणी पोहोचवण्याची त्यांची प्रामाणिकता आणि जिद्द कौतुकास्पद आहे. ग्राहक सुरक्षेला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या या कॅम्पेनचा भाग बनून मला आनंद होत आहे. या कॅम्पेनची सर्वात मोठी विशेषता म्हणजे यात फक्त सेलिब्रिटीचा वापर करण्यात आलेला नाही, तर एक प्रभावी रूपक सादर करण्यात आले आहे.

# कृषी विज्ञान केंद्र बारामती अंतर्गत कुक्कुटपालन व्यवस्थापन प्रशिक्षण संपन्न



**शारदानगर (दै. संध्या) :**

कृषी विज्ञान केंद्र (KVK), बारामती अंतर्गत दि. ७ ते ९ मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले तीन दिवसीय कुक्कुटपालन व्यवस्थापन प्रशिक्षण पार पडले. या प्रशिक्षणाद्वारे आधुनिक कुक्कुटपालनाचे तंत्र आणि व्यवस्थापनाचे धडे नवउद्योजकांना देण्यात आले.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि तांत्रिक माहिती प्रशिक्षणादरम्यान विविध विषयांवर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले डॉ. रतन जाधव (माजी विषय विशेषज्ञ, पशुसंवर्धन, KVK बारामती) यांनी पोल्ट्री व्यवसायाचा पाया असलेल्या शेडसाठी जागेची निवड, उभारणीचे प्रगत तंत्रज्ञान आणि शेडचे निर्जंतुकीकरण यावर भर दिला. तसेच, लिटर मॅनेजमेंट (गादी व्यवस्थापन), खाद्य व पाणी व्यवस्थापन आणि लसीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. श्रीकृष्ण खंदारे (कृषी महाविद्यालय, शारदानगर): यांनी कोंबड्यांच्या विविध जातींची माहिती देऊन उन्हाळ्यातील आव्हानात्मक हवामानात पक्षांचे व्यवस्थापन कसे करावे, याचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शन खाली ब्रुडिंग, लसीकरण आणि निर्जंतुकीकरण यांबाबतचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देखील राबविण्यात आले. डॉ. सचिन सोरटे यांनी कोंबड्यांवर येणारे विविध आजार, त्यांची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक लसीकरण या तांत्रिक विषयावर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. प्रक्षेत्र भेट (Field Visit) प्रशिक्षणाचा भाग म्हणून प्रशिक्षणार्थींनी पणदरे येथील लेअर पोल्ट्री फार्म आणि आधुनिक EC (Environment Controlled) तसेच पिल्लांच्या संगोपनासाठीचे युनिट.( Chick brooding Unit ) शेड ला भेट दिली. यावेळी श्री. घनवट आणि श्री. साबळे यांनी प्रत्यक्ष कामकाजाची आणि व्यवस्थापनाची सविस्तर माहिती प्रशिक्षणार्थींना दिली, ज्यामुळे त्यांना व्यावसायिक अनुभवाची जोड मिळाली.

सहभाग या तीन दिवसीय प्रशिक्षणासाठी पुणे, मुंबई, सातारा, इंदापूर आणि बारामती या भागांतून एकूण २० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कुक्कुटपालन व्यवसायाकडे वळणाऱ्या तरुणांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी हे प्रशिक्षण अत्यंत दिशादर्शक ठरले.

# दोन दिवसात कारवाई झाली नाही तर आंदोलन करणार - आमदार रोहित पवार

**लोणी काळभोर (दै. संध्या) :**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर आज शाही फेकून धक्काबुक्की केल्याची घटना आळंदी म्हातोबाची येथे घडली. त्यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार हे लोणी काळभोर पोलीस स्टेशनला आले होते. त्यावेळी त्यांनी दोन दिवसात जर शाई फेकणाऱ्यांवर कारवाई झाली नाही तर आम्ही आंदोलन करू असा इशारा दिला. विकास लवांडे हे आळंदी म्हातोबाची येथे दशक्रिया विधीच्या प्रवचनासाठी आले असता. स्मशानभूमीच्या जवळ संग्राम भंडारे, अक्षय कांचन व इतर दहा जणांनी त्यांना अडवून त्यांच्यावर शाई ओतून धक्काबुक्की करून अश्लिल भाषेत शिवीगाळ करून मारहाण केली व तुला सोडणार नाही अशी धमकी दिल्याची फिर्याद विकास लवांडे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दिली आहे.

याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की पोलिसांशी आम्ही चर्चा केली असून जे कलम पाहिजे ते टाकले नाही . शिव्या देणे हे संतांच्या विचाराचे आहेत का? त्यामुळे कडक कारवाई करण्याची आमची अपेक्षा होती . पोलिसांनी सांगितले की दोन दिवसात कारवाई झालेली दिसेल म्हणून आम्ही वर्दीचा मान राखुन दोन दिवस आम्ही पोलिसांना वेळ दिला.



## जाहीर नोटीस

आळे, ता. जुन्नर, जि.पुणे व आसपासचे तमाम लोकांना विशेषतः गाव लोकांना जाहीर नोटीसाने कळविणेत येते की,

सौ. शितल संतोष पादीर, सौ. स्नेहल कुणाल रायकर, कु. स्वप्नल हरी भिटे यांचे वडील व श्रीमती. शालिनी हरी भिटे यांचे पती हरी गेणु भिटे यांचे दि. २९/०९/२०२५ रोजी गाव-रूबी हॉल हॉस्पीटल, पुणे येथे निधन झालेले आहे. मयत हरी गेणु भिटे यांना आम्ही वरील लोक हेच कायदेशीर वारस असुन त्यांना आमचे अशिलांशिवाय इतर कुणीही वारस नाही.

मयत हरी गेणु भिटे यांचे नावावर मारूती सुझुकी इंडीया लि. कंपनीची ASTAR VXI, गाडी नं.MH-12 GK-0679, इंजिन नं. K10BN1303836 चॅसीज नं. MA3EPDE1S00379554 ही गाडी आरटीओ दप्तरी नावावर आहे. मयत हरी गेणु भिटे यांचे मृत्युपश्चात सदरची गाडी आम्हा वारसांपैकी श्रीमती. शालिनी हरी भिटे यांचे नावावर आरटीओ दप्तरी नोंद करणेस आमची संमती आहे त्यास आमची कोणतीही हरकत नाही. हरी गेणु भिटे यांचे मृत्युनंतर त्यांचे कायदेशिर वारसदार म्हणुन श्रीमती. शालिनी हरी भिटे नावे गाडी हस्तांतरण करण्यास उपप्रादेशिक परिवहन कार्यालय-पिंपरी चिंचवड, पुणे यांचेकडे कागदपत्र सादर केली आहे.

सदर वाहनासंदर्भात जर कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास आमचे अशिलांचे वकील आणि उपप्रादेशिक परिवहन कार्यालय-पिंपरी चिंचवड पुणे यांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसात लेखी स्वरूपात कळवावे सदर मुदतीत तक्रार न आलेस आपल्यापैकी कोणाचीही तक्रार नाही असे गृहीत धरून सदर वाहन् आमचे अशिल त्यांचे नावे हस्तांतर करून घेतील याची कृपया नोंद घ्यावी.

आळेफाटा
दि. ९/०५/२०२६

**येणेप्रमाणे नोटीस**
**श्रीमती. शालिनी हरी भिटे**
**यांचेकरिता ॲड. संजय किसनराव टेंभे**
**ॲडव्होकेट व नोटरी (भारत सरकार)**
**आळेफाटा, बालाजी हाईटस् ता. जुन्नर,**
**जि. पुणे मो.नं. ९८९०१८४२७८**



# जमिनीच्या तणावातून दोन गटांत मारहाण, दोन जखमी; सहा आरोपींवर गुन्हा

**उरुळी कांचन (दै. संध्या) :**

शिंदवणे (ता. हवेली) येथील शितोळे मळा येथे जमिनीच्या किरकोळ वादातून भावकीमध्ये दोन गटांमध्ये कटर, कोयता, लाथाबुक्क्या आणि चपलेने मारहाण झाल्याची घटना घडल्याने दोन जण जखमी झाले असून सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगेश तुळशीराम महाडीक (वय ३६) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संतोष उत्तम महाडीक, सुदर्शन विठ्ठल महाडीक आणि तन्मय रविंद्र काकडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष उत्तम महाडीक (वय ३५, रा. शिंदवणे शितोळे मळा, ता. हवेली) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मंगेश तुळशीराम महाडीक, तुळशीराम बाजीराव महाडीक आणि यमुना तुळशीराम महाडीक यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे भावकी असून शिंदवणे ग्रामपंचायत हद्दीतील गट क्रमांक २१७ मधील प्लॉटवर गुरुवारी (ता. ७) दुपारी दीडच्या सुमारास घडली, संतोष महाडीक आणि सुदर्शन महाडीक हे गट क्रमांक २१७ मधील प्लॉटवर CCTV कॅमेऱ्याचे सेटिंग सुरू करण्यासाठी गेले होते. त्यावेळी तुळशीराम बाजीराव महाडीक यांनी तेथे येत शिवीगाळ केली आणि या प्लॉटमध्ये यायचे नाही, अशी दमदाटी केली. त्यानंतर काही वेळातच मंगेश तुळशीराम महाडीक आणि यमुना तुळशीराम महाडीक घटनास्थळी आले.



रजिस्टर नंबर डी. एल. 33004/99 REGD. No. 33004/99

**भारत का राजपत्र**
**The Gazette of India**

असाधारण

EXTRAORDINARY

भाग II - खण्ड ३ उपखण्ड (ii)

PART II - Section 3 - Sub-section (ii)

प्राधिकारी द्वारे प्रकाशित

PUBLISHED BY AUTHORITY

सं ५२४७ नवी दिल्ली, बुधवार, नोव्हेंबर २६, २०२५/अग्रहायण ५, १९४७

No. 5247 NEW DELHI, WEDNESDAY, NOVEMBER 26, 2025/AGRAHAYANA 5, 1947

**सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय**

**अधिसूचना**

**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर २०२५**

ज्या अर्थी भारत सरकार सडक, परिवहन व महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडुन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ (१९५६ चा ४८) च्या कलम ३A(१) खालील अधिसूचना क्र. २६१८ (अ) दिनांक १३ जून २०२५ रोजी भारत सरकारच्या असाधारण राजपत्र पै. II खंड ३ उपखंड (ii) मध्ये प्रसिध्द करण्यात आली असून असे अधिसूचित करणेत आले होते, की त्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचित स्थूलमानाने दर्शविण्यात आलेल्या जमिनीची महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ (जुना एनएच-४) टोल प्लाझा तळेगाव-चाकण-शिक्रापूर-न्हावरा राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८डी कि.मी.५४/०० ते ८२/१२० (शिक्रापुर ते न्हावरा खंड) एकूण लांबी २८.१२० कि.मी. पर्यंतच्या जमिनींची रुंदीकरणासाठी तसेच देखभाल, व्यवस्थापन आणि प्रचलन या सार्वनिक प्रयोजनासाठी सोबत दिलेल्या अनुसूचीमध्ये ज्याचे संक्षिप्त वर्णन दिले आहे, त्या जमिनी संपादनाचा हेतु या अधिसूचनेद्वारे जाहीर करीत आहे.

आणि उक्त अधिसूचना उक्त अधिनियमाचे कलम ३A (३) खाली दि. १६ जुलै २०२५ रोजी “हिंदुस्तान टाईम्स” (इंग्रजी) आणि “प्रभात” (मराठी) मध्ये प्रकाशित करणेत आली होती.

आणि त्याअर्थी भारत सरकार, सडक व परिवहन व महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडुन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ (१९५६ चा ४८) च्या कलम ३D (१) खालील अधिसूचना क्रमांक का. आ. ५४२५ (अ) दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी भारत सरकारच्या असाधारण राजपत्र पै. II खंड ३ उपखंड (ii) मध्ये प्रसिध्द करण्यात आली असून, असे अधिसूचित करणेत आले आहे, की या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचित स्थूलमानाने दर्शविण्यात आलेल्या जमिनींची महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ न्हावरा राष्ट्रीय महामार्ग क्र-शिक्रापूर-चाकण-टोल प्लाझा तळेगाव (४-जुना एनएच) ४८ डी कि ००/५४.मी.ते) १२०/८२ शिक्रापुर ते न्हावरा खंड (एकूण लांबी २८.१२० कि.मी. पर्यंतच्या जमिनींची रुंदीकरण, देखभाल व व्यवस्थापन व प्रचलन कामी सक्षम प्राधिका-याचा कलम ३D (१) खालील अहवाल प्राप्त झाल्यानंतर सर्व हरकतीचा विचार करुन संपादित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३D (२) उपबंधानुसार या जमिनी भारत सरकारच्या राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून खालील अनुसूचित नमूद केलेल्या जमिनी बोजाविरहित केंद्र शासनाकडे निहीत झाल्या आहेत.

आणि त्याअर्थी सक्षम प्राधिकारी त्यांना कायद्याप्रमाणे असणाऱ्या अधिकारांचा वापर करुन संपादनाखालील जमिनीची हितसंबंधितांना द्यावयाची नुकसानभरपाई निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु करीत आहेत आणि म्हणून संपादनाखालील जमिनीत हितसंबंध असणाऱ्या सर्व हितसंबंधित व्यक्तींना याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, जमिनीतील हितसंबंधितांचे असणारे त्यांचे हक्काचे स्वरुप व नुकसान भरपाई संदर्भातील त्यांच्या मागण्यासंबंधीचे निवेदन सक्षम प्राधिकारी यांचे समोर खाली नमूद केलेल्या तारीख, वेळ व ठिकाणी स्वतः जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर होऊन देण्यात यावे.

| अ. क्र | गावाचे नाव | तारीख | सुनावणीची वेळ | सुनावणीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे न्हावरा, ता. शिरूर, जि. पुणे | १५/५/२०२६ | सकाळी ११.३० ते दुपारी ३.०० | उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रं. १७, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, बी-विंग, दुसरा मजला, पुणे ४११००१ |

असेही घोषित करण्यात येत आहे, की संपादित क्षेत्रातील हितसंबंधित व्यक्तीकडुन सक्षम प्राधिका-यासमोर नेमून दिलेल्या तारीख, वेळ व ठिकाणी हजर होण्यास कसूर झाल्यास, तसेच जमिनीतील हक्कांचे स्वरुप व नुकसान भरपाई संबंधातील मागण्या संबंधित योग्य व कायदेशीर पुराव्यासहीत निवेदन न केल्यास संबंधितास याबाबत काहीही निवेदन करावयाचे नाही, असे गृहीत धरुन नुकसान भरपाईची रक्कम नियमाप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र 548डी जो की जंक्शन एनएच-48 (जुना एनएच-4) पासून सुरु होवून तळेगाव-चाकण-शिक्रापूर-न्हावरा रस्त्यापर्यन्त कि.मी. 54+000 ते 82+120 (शिक्रापूर न्हावरा खंड) एकूण लांबी 28.120 कि.मी.साठी आवश्यक जमिनींचे संक्षिप्त वर्णन.

| अ.क्र | गट/सर्वे नंबर | जमिनीचा प्रकार | जमिनीचा पोत | जमिनीचे क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|---|
| गावाचे नाव : न्हावरा, ता. शिरूर, जि. पुणे | | | | |
| १ | ११३३ भाग | खाजगी | असिंचित | ०.०८२ |
| २ | १२ भाग | सरकारी | असिंचित | ०.००३ |
| ३ | ३ भाग. | खाजगी | असिंचित | ०.००४ |
| ४ | ८८३ भाग | खाजगी | असिंचित | ०.१७ |
| एकूण | | | 0.259 | |

**सही/-**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १७) पुणे**

*जिमाका/पुणे/जाहिरात/४४/२०२६-२७*

## थोडक्यात पण महत्वाचे...




### विरंगुळा केंद्र सामाजिक संवादासाठी व्यासपीठ ठरेल : महापौर रवि लांडगे

■ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मोरवाडी येथील देऊबाई कापसे उद्यानात बहुउद्देशीय विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहरातील उद्याने ही शहराचा श्वास आहेत. इतर शहरांच्या तुलनेत आपल्या शहरात अधिक उद्याने असून, त्यांचे संगोपन आणि संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. उद्यानांमध्ये उभारण्यात येणाऱ्या विरंगुळा केंद्राच्या माध्यमातून सर्व वयोगटातील नागरिकांना एकत्र येण्यासाठी, व्यायाम, सांस्कृतिक उपक्रम आणि सामाजिक संवादासाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोरवाडी येथील देऊबाई कापसे उद्यान परिसरात बहुउद्देशीय दोन मजली विरंगुळा केंद्राच्या कामाचे भूमिपूजन आज महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य कुशाग्र कदम, तुषार हिंगे, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व परिसरातील नागरिक उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले की, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून शहरातील उद्यानांचे आधुनिकीकरण आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्यावर विशेष भर दिला जात आहे. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळून त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कापसे उद्यानात उभारण्यात येणाऱ्या दोन मजली विरंगुळा केंद्रासाठी ६ लाख ५३ हजार रुपये खर्च येणार असून या कामाची मुदत ८ महिन्यांची आहे. विरंगुळा केंद्र १८ मीटर बाय ८ मीटर असे एकूण २८८ चौरस मीटर परिसरात असणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

### यशवंतराव चव्हाण स्मारक समितीस 1 कोटी अनुदानाचा प्रस्ताव, वाद पेटला

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महापालिकेकडून स्मारक समितीस १ कोटी रुपयांचे अतिरिक्त अनुदान देण्याच्या प्रस्तावावरून शहरात वाद निर्माण झाला आहे. स्थायी समितीने या प्रस्तावाला सकारात्मक शिफारस केली असून अंतिम निर्णयासाठी तो महापालिका सभेकडे पाठविण्यात आला आहे. शहरातीलची स्थापना १९८९ मध्ये झाली असून १९९२ मध्ये निगडी प्राधिकरण परिसरात ४४ गुंठे जागेवर स्मारक उभारण्यात आले आहे. येथे ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका, सांस्कृतिक भवन, वैद्यकीय केंद्र आणि विद्यार्थी मार्गदर्शन केंद्र अशा विविध सुविधा उपलब्ध आहेत. महापालिकेकडून या स्मारकासाठी यापूर्वी २०१८-२१, २०२२-२३ आणि २०२४-२५ या कालावधीत प्रत्येकी ५ कोटी रुपये, असे एकूण १५ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. या निधीतून स्मारकाची इमारत व इतर सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत. सध्या स्मारक परिसरात १४० kWp क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारणे तसेच आवश्यक फर्निचर उपलब्ध करून देण्याची गरज समितीने व्यक्त केली आहे. यासाठी अतिरिक्त १ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. मात्र, यापूर्वी भविष्यात कोणतीही शासकीय मदत मागणार नाही, अशी हमी समितीने दिली होती. त्यामुळे या हमीपत्रातून सूट देण्याचा प्रस्ताव समोर आला आहे. दरम्यान, या प्रस्तावाला काही राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांनी विरोध दर्शवला आहे. महापालिकेच्या निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोप करत अनुदान रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. यामुळे हा विषय आता राजकीय वर्तुळात चर्चेचा ठरला आहे. सचिन काळभोर यांनी विरोध नोंदवुण या पार्श्वभूमीवर महापालिका सभेच्या निर्णयाकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

### चिंचवडमध्ये महिलांसाठी मोफत 'स्वसंरक्षण प्रशिक्षण' शिबिराचे आयोजन




■ नगरसेविका पल्लवी वाल्हेकर यांची संकल्पना

पिंपरी (दैनिक संध्या) : सध्याच्या काळात महिलांची सुरक्षा हा अत्यंत महत्त्वाचा विषय बनला असून, महिलांना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका सौ. पल्लवीताई सुधीर वाल्हेकर यांच्या संकल्पनेतून एका विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वाल्हेकरवाडी येथे येत्या सोमवारी, ११ मे रोजी महिलांसाठी 'मोफत एकदिवसीय महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर' (Self-Defence Training Camp) आयोजित करण्यात आले आहे. "स्वसंरक्षणाचे ज्ञान – प्रत्येक महिलेची खरी ताकद!" हे ब्रीदवाक्य घेऊन हे शिबिर राबवले जात आहे. केवळ डान्स आणि संगीतापुरते मर्यादित न राहता, आजच्या काळात आपल्या मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देणे ही काळाची गरज असल्याचे पल्लवीताई वाल्हेकर यांनी म्हटले आहे. या शिबिराद्वारे महिलांना कोणत्याही शस्त्राशिवाय स्वतःचा बचाव कसा करावा, याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाणार आहे. या शिबिरासाठी नावनोंदणी करणे अनिवार्य आहे. नाव नोंदवण्यासाठी ७०२०० ०८७८३ किंवा ८८३-०९५०८०६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. जास्तीत जास्त महिला व युवतींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि स्वतःला सुरक्षित करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन नगरसेविका पल्लवी सुधीर वाल्हेकर यांनी केले आहे.

### जमिनीच्या वादातून वडील, सावत्र आई आणि भावाकडून तरुणाची हत्या

बारामती (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील जोगवडी येथे कौटुंबिक वादाचे अत्यंत भीषण रूप समोर आले आहे. शेतजमिनीच्या वादातून एका तरुणाची त्याच्या स्वतःच्या वडिलांनी, सावत्र आईने आणि सावत्र भावाने हत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. सूरज संजय गुळूमकर असे मृत तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी (दि. ८) रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, गुळूमकर कुटुंबामध्ये गेल्या काही दिवसांपासून शेतजमिनीच्या मालकी आणि वाटणीवरून वाद सुरू होता. शुक्रवारी रात्री हा वाद पुन्हा उफाळून आला आणि घरातील वातावरण तणावपूर्ण बनले.वाद विकोपाला गेल्यानंतर सूरज याच्यावर त्याचे वडील संजय धोंडीबा गुळूमकर, सावत्र आई माया संजय गुळूमकर आणि सावत्र भावाने मिळून हल्ला केल्याचा आरोप आहे.

# महापौर चषक : युवा खेळाडूंना व्यासपीठ देण्यासाठी उपयुक्त

**मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील**



पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड शहर क्रीडा क्षेत्रात वेगाने पुढे जात असून महापौर चषकासारख्या स्पर्धांमुळे राज्यातील युवा खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळत आहे. अशा स्पर्धा केवळ खेळापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर शिस्त, नेतृत्व आणि संघभावना घडविण्याचे कार्य करतात, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तथा संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. आपला देश क्रीडा क्षेत्रात वेगाने प्रगती करत असून २०३६ पर्यंत भारत नक्कीच ऑलिम्पिक स्पर्धेचे यजमानपद यशस्वीपणे भूषवेल, असेदेखील ते म्हणाले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने भोसरी येथील गावजत्रा मैदान येथे आयोजित "महापौर चषक २०२६-२०२७" राज्यस्तरीय स्पर्धेला मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी भेट देत शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांचा सत्कार केला तसेच खेळाडूंसोबत संवाद साधला,त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार महेश लांडगे, विधानपरिषद सदस्या आमदार उमा खापरे ,भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांच्यासह महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, महिला बालकल्याण समिती सभापती राणीमाई पठारे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्य शाम जगताप, मंदार देशपांडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, पंकज पाटील, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, आय.टी.सेलच्या संजिवनी पांडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, माजी नगरसदस्य विलास मडिगेरी, विकास डोळस, राजू दुर्गे, ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, 'भारत क्रीडा क्षेत्रात वेगाने प्रगती करत असून २०३६ मध्ये भारतात ऑलिम्पिक स्पर्धा होणार आहेत. या दृष्टीने देशभरात क्रीडा स्पर्धांसाठी अत्याधुनिक क्रीडांगणे, प्रशिक्षण केंद्रे व आवश्यक सोयी-सुविधा उभारल्या जात आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या विविध उपक्रमांमुळे क्रीडेला चालना मिळत असून खेळाडूंना जागतिक दर्जाचे वातावरण व प्रशिक्षण उपलब्ध होत आहे. ही सर्व पावले २०३६ ऑलिम्पिकच्या दृष्टीने महत्त्वाची तयारी मानली जात असून भारत त्या दिशेने सक्षम पायाभरणी करत आहे, असे देखील मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

यावेळी विविध क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यामध्ये बॉक्सिंग क्षेत्रातील विजय यादव, सायकलिंग क्षेत्रातील मीनाक्षी शिंदे, पॅरा जलतरणपटू वैष्णवी जगताप तसेच कबड्डीपटू विराज लांडगे यांचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी आमदार महेश लांडगे यांनी भोसरी परिसरातील क्रीडा संस्कृती अधिक सक्षम करण्यासाठी भविष्यातही अशा मोठ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. तर महापौर रवि लांडगे यांनी शहरातील युवकांना दर्जेदार क्रीडा व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न असल्याचे सांगितले. तसेच अशा स्पर्धांमधून अनेक गुणवंत खेळाडू घडतील,असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

## 'के-नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक सेंटर ऑफ एक्सलन्स' ची स्थापना होणार

पिंपरी (दै. संध्या)




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय मध्ये 'के-नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक सेंटर ऑफ एक्सलन्स' या सेलची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठीचा सामंजस्य करार पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय आणि के. नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक, पुणे यांच्या मध्ये करण्यात आला. पीसीसीओई संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी आणि कंपनीचे संस्थापक, संचालक प्रशांत अग्रवाल यांनी करारावर स्वाक्षरी केली. यावेळी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पंकज श्रीवास्तव, महाविद्यालयाचे स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. अजय गायकवाड, संशोधन व विकास विभागाचे अधिष्ठाता डॉ. नरेंद्र देवरे, डॉ. धीरजकुमार लाल, डॉ. विनय रंगारी आदी उपस्थित होते.

के नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक ही कंपनी अत्याधुनिक बांधकाम तंत्रज्ञान क्षेत्रात, विशेषतः थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जलद, मजबूत आणि किफायतशीर इमारती उभारण्यात अग्रेसर आहे. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अल्पावधीत अचूक रचनात्मक बांधकाम करता येते, ज्यामुळे वेळ, खर्च आणि मनुष्यबळ यांची बचत होते. तसेच प्रीकास्ट आणि मॉड्युलर बांधकाम पद्धती, पर्यावरण पूरक आणि शाश्वत बांधकाम उपाययोजना, आधुनिक यंत्रणांचा वापर करून बांधकाम क्षेत्रात नवोपक्रम घडवून आणण्याचे कार्य कंपनी करत आहे.

या कराराच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना थ्रीडी प्रिंटिंगसह अत्याधुनिक बांधकाम तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण, उद्योगाशी निगडित प्रकल्पांमध्ये सहभाग, संशोधनाच्या नव्या संधी तसेच रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच प्राध्यापकांना संशोधन आणि नवोपक्रमासाठी आधुनिक सुविधा मिळणार असून उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील दुवा अधिक मजबूत होणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड परिसरातील अभियांत्रिकी शिक्षणाला नवे बळ मिळणार असून विद्यार्थ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्याच्या संधी निर्माण होणार आहेत अशी माहिती पीसीसीओई संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

डॉ. धीरजकुमार लाल आणि डॉ. विनय रंगारी यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी महाविद्यालयाचे संचालक आणि मार्गदर्शक, प्राध्यापक, समन्वयक यांचे हा सामंजस्य करार केल्याबद्दल अभिनंदन केले.

## भामा आसखेड धरणातून पाणी सोडले; सिद्धेगव्हाणपर्यंत बंधारे भरले

भामा आसखेड (दै. संध्या)

पुणे जलसंपदा विभागाच्या प्रशासनाने खेड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार भामा-आसखेड धरणातून पाणी सोडल्याने तालुक्यातील सिद्धेगव्हाणपर्यंतचे बंधारे पाण्याने भरले आहेत. सोडलेल्या पाण्याचा फायदा शेतकऱ्यांच्या उन्हाळी पिकांना होत असून, सध्या भामा आसखेड धरणामध्ये 47.47 टक्के दिलासादायक पाणीसाठा शिल्लक आहे.

खेड, शिरूर, दौंड आणि हवेली या चार तालुक्यांना शेतीसाठी, तसेच अनेक गावांना पिण्याचे पाणी या धरणातून पुरवले जाते. याशिवाय, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील काही भागालाही या धरणातून पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे 8.14 टीएमसी क्षमतेचे भामा आसखेड धरण या चार तालुक्यांसाठी हरितक्रांतीचे वरदान ठरले आहे. मागील आठवड्यात शेतकऱ्यांच्या मागणीनुसार जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी धरणापासून सिद्धेगव्हाणपर्यंतचे बंधारे भरण्यासाठी तीन दिवस पाणी सोडले होते. या पाण्याचा प्रमुख फायदा शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी होत आहे. शेतकऱ्यांनी मागणी करताच अधिकाऱ्यांनी तत्काळ पाणी सोडल्याने शेतकरीवर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्ह्यातील इतर धरणांच्या तुलनेत भामा आसखेड धरणातील पाणीसाठा अधिक असल्याचे दिसून येत आहे. पावसाळा सुरू होण्यासाठी अवघा एक महिना शिल्लक असताना धरणातील उपलब्ध पाणीसाठा दिलासादायक मानला जात आहे.

## खंडाळा घाटातील वाहतूक कोंडीला 'मिसिंग लिंक'चा मोठा दिलासा

लोणावळा (दै. संध्या)

मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख शहरांना जोडणाऱ्या प्रवासात मोठा अडथळा ठरणाऱ्या खंडाळा घाटातील जीवघेणी वाहतूक कोंडी आता कायमस्वरूपी सुटण्याची चिन्हे दिसत आहेत. महाराष्ट्र शासनाने खालापूर ते लोणावळा दरम्यान विकसित केलेल्या 'मिसिंग लिंक'चे 1 मे रोजी लोकार्पण करण्यात आले असून, गेल्या आठवडाभरापासून या मार्गामुळे खंडाळा घाटातील वाहतूक कोंडी अक्षरशः इतिहासजमा झाली आहे. या नवीन मिसिंग लिंकमुळे खंडाळा घाटातील अवघड चढ-उतार पूर्णपणे टाळणे शक्य झाले आहे. पूर्वी खालापूर ते लोणावळा हे अंतर पार करण्यासाठी प्रवाशांना मोठा वेळ लागत असे, मात्र आता हा प्रवास केवळ 7 ते 8 मिनिटांत पूर्ण होत आहे. गेल्या आठवडाभराच्या निरीक्षणात असे दिसून आले की, खंडाळा घाटात कुठेही वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या नाहीत. सध्या या मार्गावरून अवजड वाहनांची वाहतूक सुरळीत सुरू असून, प्रवासी वाहनांची संख्या तुलनेने कमी असली तरी, बहुतांश पर्यटक 'मिसिंग लिंक'च्या सुसाट प्रवासाला पसंती देत आहेत. यामुळे वाहनांच्या इंधनाची बचत होत असून, इंजीनवर येणारा लोडही कमी झाला आहे.

एकूणच, 'मिसिंग लिंक'मुळे मुंबई-पुणे प्रवास अधिक सुरक्षित आणि वेगवान झाला असला, तरी लोणावळ्यातील पर्यटन व्यवसायाला आता बदलत्या प्रवासाच्या पद्धतीनुसार स्वतःला अनुकूल करून घ्यावे लागणार आहे. या नवीन बदलाचे लोणावळ्यातील पर्यटन आणि व्यापारी क्षेत्रावर संमिश्र परिणाम पाहायला मिळत आहेत.

## पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्तीपूर्व सूक्ष्म नियोजनावर भर द्यावे

पिंपरी (दै. संध्या)



**आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे निर्देश**

येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवून आपत्तीपूर्व सूक्ष्म नियोजनावर भर द्यावा. शहरात पाणी साचणाऱ्या ठिकाणांची ओळख करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात व नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करावीत. तसेच पूरप्रवण भागांतील नागरिकांच्या स्थलांतराचे पुर्वनियोजन करावे आणि आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे सभागृहात मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, सुनिल जावरानी, प्रेरणा सिनकर, अनिल भालसाखळे, मनोज सेठिया, माणिक चव्हाण, उप आयुक्त संदीप खोत, राजेश आगळे, अण्णा बोदडे, सिताराम बहुरे, डॉ. प्रदीप ठेंगल, व्यंकटेश दुर्वास, अतुल पाटील, चेतना केरूरे, ममता शिंदे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अजिंक्य येळे, अमित पंडित, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, पुजा दुधनाळे, अश्विनी गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, कार्यकारी अभियंता चंद्रकांत मुठाळ, शिवाजी चौरे, सुनिल शिंदे, हरविंदरसिंह बन्सल, दमयंती पवार, संतोष दुर्गे, महेश कावळे, समीर दळवी, जाहिरा मोमीन, राजेंद्र जावळे, गणेश राऊत, अभिमान भोसले, बी. पी. लांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल तसेच संबंधित विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी यंत्रणा पूर्णपणे सज्ज ठेवून आपत्तीपूर्व सूक्ष्म नियोजन करणे अत्यावश्यक आहे. शहरामध्ये ज्या ठिकाणी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर साचते, अशा ठिकाणांची तात्काळ ओळख करून तेथे कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात.

# सेवा रस्त्याचे निकृष्ट काम तत्काळ तोडा : श्रीरंग बारणे

पिंपरी (दै. संध्या)



महापालिका हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-बंगळुरू महामार्ग (देहूरोड-कात्रज) बाह्यवळण मार्गावरील मामुर्डी ते वाकड दरम्यान सेवा रस्त्याचे काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने केले जात आहे. किवळे येथे रस्त्यांचे काम अतिशय निकृष्ट झाले आहे. येत्या १५ दिवसांत सद्यस्थितीतील निकृष्ट काम पूर्णपणे काढून टाकून नव्याने दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण करण्याचे निर्देश खासदार श्रीरंग बारणे यांनी एनएचआयच्या अधिकाऱ्यांना दिले.

महापालिका हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-बंगळुरू महामार्ग (देहूरोड-कात्रज) बाह्यवळण मार्गावरील मामुर्डी ते वाकड येथील मुळा नदीवरील पुलापर्यंत दोन्ही बाजूस सेवा रस्त्यांचा विस्तार करण्यात येणार आहे. १२ मीटर अंतराने रस्त्याचा विस्तार करण्याचा आराखडा भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तयार केला आहे. त्यानुसार काम सुरू करण्यात आले आहे. या कामाची खासदार बारणे यांनी गुरुवारी पाहणी केली. यावेळी शिवसेना शहर प्रमुख तथा नगरसेवक निलेश तरस, नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस, युवासेना मावळ लोकसभा राजेंद्र तरस यांच्यासह महामार्ग विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, किवळे ते वाकड दरम्यान दोन्ही बाजूंनी बारा मीटर सेवा रस्ता विकसित केला जाणार आहे. किवळे येथे झालेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी आल्या होत्या.

पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी निष्कृष्ट दर्जाचे काम आढळून आल्याने संबंधित अधिकारी व ठेकेदारांना कामाच्या गुणवत्तेबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेशी आणि दैनंदिन वाहतुकीशी संबंधित कामांमध्ये कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. येत्या १५ दिवसांत सद्यस्थितीतील निकृष्ट काम पूर्णपणे काढून टाकून नव्याने दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण करण्याचे सक्त निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या या कामामध्ये गुणवत्ता, टिकाऊपणा आणि नागरिकांच्या सुविधेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचनाही करण्यात आल्या.

**कामाला गती द्या**

या सेवा रस्त्याची पुढील पाच वर्षे देखभाल दुरुस्ती ठेकेदारच करणार आहे. काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करावे. कामामुळे वाहतूक कोंडी होत आहे. समीर लॉन्स परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. पावसाळा तोंडावर येऊनही काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे कामाला गती द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## श्रीज्योतिर्लिंग देवस्थानासाठी व्यवस्थापन समिती स्थापनेच्या हालचालींना वेग

■ रविवारी मंदिरात ग्रामस्तसभेच आयोजन

नीरा (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ असलेल्या गुळुंचे येथील श्री ज्योतिर्लिंग देवस्थानाच्या व्यवस्थापन समिती स्थापनेसंदर्भात ग्रामस्थसभेचं आयोजन करण्यात आले असून, यामुळे गावासह भाविकांमध्ये उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे. देवस्थानाच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी आणि भविष्यातील विकास आराखड्याला दिशा देण्यासाठी ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. ग्रामस्थांमार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचनेनुसार, रविवार दिनांक १० मे २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता श्री ज्योतिर्लिंग मंदिर परिसरात ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत देवस्थानाच्या व्यवस्थापन समितीची स्थापना, आणि सामाजिक उपक्रमांबाबत चर्चा होणार आहे. श्री ज्योतिर्लिंग देवस्थान हे शासनाच्या 'ब वर्ग देवस्थान' यादीत समाविष्ट असून, या देवस्थानासाठी शासनाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जातो. या निधीतून मंदिर परिसराचा विकास, भाविकांसाठी सुविधा, रस्ते, पाणी, प्रकाश व्यवस्था तसेच धार्मिक सोयीसुविधा उभारण्याची कामे केली जात आहेत. त्यामुळे देवस्थानाचा परिसर सध्या वेगाने विकसित होताना दिसत आहे. गुळुंचे येथील श्री ज्योतिर्लिंग देवाची यात्रा राज्यभरात 'काटे बारस यात्रा' म्हणून प्रसिद्ध आहे. या यात्रेदरम्यान भाविक बाभळीच्या काट्यांच्या ढिगाऱ्यात उड्या घेत श्रद्धा व्यक्त करतात. हे रोमांचकारी आणि अनोखे दृश्य पाहण्यासाठी महाराष्ट्रासह परराज्यातूनही हजारो भाविक येथे दाखल होत असतात. यात्रेच्या काळात लाखोंच्या संख्येने भक्त श्री ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी गर्दी करत असतात. या पार्श्वभूमीवर देवस्थानाची अधिक सक्षम आणि पारदर्शक पद्धतीने व्यवस्था चालविण्यासाठी स्वतंत्र व्यवस्थापन समिती स्थापन करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. आता ग्रामस्थसभेतून या प्रक्रियेला अधिकृत दिशा मिळणार असल्याने ग्रामस्थ आणि भाविकांनी बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गावातील अक्षय निगडे व ज्योतिर्लिंग देवस्थान जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष गोरख निगडे यांच्या माध्यमातून ग्रामस्थ सभेचे आयोजन करण्यात आले आहे तर याबाबत गावात, दवंडी भित्तीपत्रके,सूचना फलक यामाध्यमातून लोकांना माहिती देण्यात येत आहे.

## यवत पोलिस हद्दीत अकस्मात मयत

दौंड (दैनिक संध्या) : दौंड तालुका चौफुला येथे प्रभू विठोबा काळे वय ६५उची 5 फुट रंग सावळा राहणार चौफुला तालुका दौंड जिल्हा पुणे सदर हा व्यक्ती पुणे येथील ससून रुग्णालयामध्ये 18 फेब्रुवारी रोजी वैद्यकीय उपचार घेण्यासाठी रुग्णालयात दाखल झाला होता परतु उपचारा दरम्यान 26 फेब्रुवारी 2026 रोजी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मयत घोषित करण्यात आले सदर हा व्यक्ती चौफुला परिसरामध्ये वास्तव्य असल्याचे सांगत होता या व्यक्तीची कोणाशी ओळख असेल तर केडगाव पोलीस स्टेशन हवालदार के एस मोहिते यांच्याशी संपर्क साधावा फोन नंबर 99 15 03 83 85 संपर्क करावा अशी केडगाव पोलीस प्रशासनाने विनंती केली आहे.

## कोलवडी-साष्टे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी चैत्राली गायकवाड यांची बिनविरोध निवड



कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : कोलवडी-साष्टे (ता. हवेली) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी चैत्राली अजित गायकवाड यांची बिनविरोध निवड पार पडली. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या निवड प्रक्रियेत लोकनियुक्त विद्यमान आदर्श सरपंच विनायक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रामविकास अधिकारी सुजाता पवार यांच्या अधिपत्याखाली ही निवड पार पडली. यामध्ये उपसरपंच पदासाठी चैत्राली गायकवाड यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बहुमताने बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सचिन गायकवाड, निलेश रिकामे, रमेश मदने, स्वप्निल नितनवरे, योगेश मुरकुटे तसेच ग्रामपंचायतीच्या सदस्या शितल भाडळे, निशा भोर, प्रिया गायकवाड, स्वाती गायकवाड, प्रियंका शितोळे, नीता भालसिंग उपस्थित होते.तसेच यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक रामदास सिताराम गायकवाड,माजी पंचायत समिती सदस्य पोपटदादा बाळासो गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या. निवडीनंतर बोलताना चैत्राली गायकवाड म्हणाल्या, ग्रामस्थांनी व सर्व सदस्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी सर्वांची ऋणी आहे. गावातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन पारदर्शक व विकासाभिमुख कामकाज करण्याचा माझा प्रयत्न राहील. पाणी, स्वच्छता, रस्ते, शिक्षण आणि महिलांच्या सक्षमीकरणावर विशेष भर देत कोलवडीचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ग्रामपंचायत प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय ठेवून गावाला आदर्श बनवण्याचे आमचे ध्येय आहे.



## राज्य उपाध्यक्षपदी सौ. स्वाती पारधी

भिवंडी (दै. संध्या) : आदिवासी समाजाच्या सामाजिक कार्यात नेहमीच सहभागी असलेल्या स्वाती सुरेश पारधी यांची ट्रायबल वुमेन्स फोरमच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. ही नियुक्ती ट्रायबल फोरमचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष अँड. प्रमोद घोडाम यांनी केली आहे. 'ट्रायबल फोरम' या संघटनेची 'ट्रायबल वुमेन्स फोरम' ही महिला शाखा आहे. हे संघटन आदिवासी समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक व आर्थिक प्रगती,अस्तित्व,अस्मिता आणि आत्मसन्मानासाठी तसेच संस्कृतीचे जतन व संवर्धन करुन सांस्कृतिक घुसखोरी रोखण्यासाठी कँडरबेस, शिस्तबद्ध, वैचारिक असलेल्या ट्रायबल वुमेन्स फोरमची निर्मिती झाली असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध पातळ्यांवर लढा देत आहे.

# निसर्गाशी नाते जोडणारा ठाणेकरांचा नवा प्रवास

भिवंडी (दै. संध्या)



ठाणे जिल्हा प्रशासन आणि 'वेसॅक इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने या मातृदिनी एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. 'आशाएं' नावाचा हा अनोखा सामुदायिक उपक्रम केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून, तो निसर्गाप्रती आपली जन्मजात ओढ आणि प्रेम पुन्हा जागृत करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. ठाण्याचे 'ट्री मॅन' आणि वेसॅक इंडियाचे संस्थापक विजयकुमार कट्टी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या मोहिमेला ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने अधिकृत पाठिंबा दर्शविला आहे.

पर्यावरणाची काळजी ही केवळ सक्ती नसून ती एक स्वयंप्रेरित ओढ असावी, या उद्देशाने हा प्रकल्प राबवला जात आहे. याद्वारे शाश्वत जीवनशैलीची एक नवी 'कौटुंबिक संस्कृती' विकसित करण्याचा मानस असून, त्याची सुरुवात आपल्या मनातून होऊन ती दैनंदिन जीवनात प्रतिबिंबित व्हावी, अशी यामागची मूळ भावना आहे.

ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना असे म्हटले आहे की, 'आशाएं' हे स्थानिक कृतीतून राष्ट्रीय प्रभाव पाडणारे एक शक्तिशाली मॉडेल आहे. जिल्हा प्रशासन केवळ धोरणे न आखता स्वतः कृती करून आदर्श निर्माण करत आहे. प्रशासकीय स्तरावर ही मोहीम आधीच सुरू झाली असून जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रत्येक कर्मचारी 'नॉन-वोव्हन पॉलिप्रोपायलेन' (NWPP) पिशव्यांचे योगदान देऊन प्लास्टिकमुक्त पर्यावरणासाठी पाऊल उचलत आहे. हा उपक्रम केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित नसून तो केंद्र सरकारच्या 'स्वच्छ भारत अभियान', 'लाईफ' (पर्यावरणासाठी जीवनशैली), 'आत्मनिर्भर भारत' आणि 'हवामान कृती लक्ष्य' यांसारख्या राष्ट्रीय उद्दिष्टांना थेट बळकटी देतो.

या उपक्रमासाठी नेहमीच सक्रिय असलेले जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांच्या मते, जेव्हा समाज एखाद्या धोरणाचा मनापासून स्वीकार करतो, तेव्हाच ते यशस्वी होते आणि 'आशाएं' हा उपक्रम प्रशासन व नागरिक यांच्यातील तो महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.

विजयकुमार कट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित होणारी ही कार्यशाळा एक नवा अनुभव देणारी ठरेल. श्री. कट्टी यांच्या मते, कोणताही शाश्वत बदल हा घरापासून आणि कुटुंबापासून सुरू व्हायला हवा. या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या कुटुंबांना दैनंदिन जीवनात सोप्या पद्धतीने पर्यावरणासाठी कसे योगदान देता येईल, याचे थेट प्रात्यक्षिक पाहायला मिळणार आहे.विशेष म्हणजे, या कार्यक्रमाला येताना नागरिकांना आपल्या घरातील वापरायोग्य NWPP पिशव्या (किराणा मालासाठी वापरल्या जाणाऱ्या कापडासारख्या पिशव्या) सोबत आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पिशव्यांचे संकलन करून त्या लहान विक्रेत्यांना वाटल्या जाणार आहेत, जेणेकरून एकदाच वापरल्या जाणाऱ्या (SUP) प्लास्टिकचा वापर कमी होईल. या उपक्रमामुळे घरात आणि कामाच्या ठिकाणी एक सकारात्मक व शाश्वत वातावरण निर्माण होण्यास मदत होईल.

हा कौटुंबिक स्नेहमेळा रविवार, १० मे २०२६ रोजी दुपारी ४:०० ते संध्याकाळी ६:०० या वेळेत २८०१ ग्रांडे, कासा रॉयल CHS, साकेत रोड, बाळकूम, ठाणे (पश्चिम) येथे पार पडणार आहे. अधिक माहितीसाठी ७९७७५१३८२२ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

या मातृदिनी आपल्या निसर्गाशी पुन्हा नाते जोडूया आणि भविष्यातील पिढीसाठी एक हिरवेगार ठाणे घडवण्यासाठी सज्ज होऊया, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## शंकरराव बुट्टे पाटील इंग्लिश मीडियम स्कूल जुन्नरचा निकाल शंभर टक्के

जुन्नर (दै. संध्या)



जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे शंकरराव बुट्टे पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, जुन्नर शैक्षणिक वर्ष 2025 - 26 इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा एकूण शेकडा निकाल सालाबाद प्रमाणे शंभर टक्के लागला. अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री काजळे यांनी दिली. प्रथम पाच विद्यार्थी व टक्केवारी पुढील प्रमाणे... प्रथम क्रमांक कुमारी. शिवानी गणेश इंगवले ९७. ४०% द्वितीय क्रमांक कुमार.अर्णव महेंद्र लोखंडे ९६.२०% तृतीय क्रमांक कुमार.सार्थक बाळू दिघे ९५.४०% तसेच कुमार.आरुष सुहास आर्वीकर ९५.४० % चतुर्थ क्रमांक सई संजय दिवटे ९२.८०% व पाचवा क्रमांक आयुष आनंद सांगडे ९२.४०% इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करणारे विद्यार्थी पालक तसेच मुख्याध्यापक, मार्गदर्शक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी व कार्यकारी मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## ज्ञानसागर गुरुकुलचा इयत्ता १०वीच्या १००% निकालाची परंपरा कायम

बारामती (दै. संध्या)



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जाहीर झालेल्या इयत्ता १०वीच्या परीक्षेच्या निकालात ज्ञानसागर गुरुकुल विद्यालयाने यंदाही उज्ज्वल यश संपादन करत १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे.यामध्ये प्रवीण महेश दराडे (93.20%) व राजवीर उमेश रणवरे (93.20%) या दोघानीं समान गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकवीला, स्वरा नितीन टकले हिने 92.60% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकवीला तसेच अदिती म्हाकू अनुसे हिने 90.20% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकवीला यानंतर माहेश्वरी भोयर (90.00%), ओम गावडे (89.80%), ईश्वरी खटावकर (88.80%), तन्वी लकडे (87.40%), करण काळे (86.60%), तनिष्का शिंदे(86.60%), श्रेया झगडे (86.00%),सुजल जाधव (85.80%), शरवरी खटके(84.20%), आरोही भाळे (83.40%), वैष्णवी शिंदे (83.40%), श्रेयश झगडे(83.20%), सार्थक माने (81.80%) वरील एकूण 17 विद्यार्थ्यांनी 80.00% पेक्षा जास्त गुण मिळवल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन तसेच विद्यालयातील इतर सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवत यश संपादन केले असून,पालक व शिक्षकांच्या मेहनतीला यशाची सुवर्णकिनार लाभली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.सागर आटोळे सर, उपाध्यक्षा रेश्मा गावडे मॅम,सचिव मानसिंग आटोळे सर,विश्वस्त पल्लवी सांगळे,विश्वस्त आरती आटोळे,दिपक सांगळे,दिपक बिबे, सी.ई.ओ.संपत जायपत्रे ,विभाग प्रमुख गोरख वणवे ,मुख्याध्यापक दत्तात्रय शिंदे,सुधीर सोनवणे, नीलिमा देवकाते,राधा नाळे,नीलम जगताप तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले आहे.विद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जातो.

नियमित सराव, मार्गदर्शन,टेस्ट सिरीज आणि शिक्षकांचे वैयक्तिक लक्ष यामुळे विद्यार्थ्यांना हे यश मिळाल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून विद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, ज्ञानसागर गुरुकुलने शिक्षण क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

# आळंदीतील शाईफेक प्रकरणाने महाराष्ट्राचे राजकारण तापले

**विकास लवांडे यांच्यावर हल्ल्यानंतर संत परंपरा, विचारस्वातंत्र्य आणि कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह**

आळंदी (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील आळंदी म्हातोबाची येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर झालेल्या शाईफेकीच्या घटनेने राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. प्रवचनासाठी गेलेल्या लवांडे यांना अडवून संग्राम भंडारे आणि त्यांच्या समर्थकांकडून शाई ओतण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून या घटनेनंतर संत परंपरा, वैचारिक स्वातंत्र्य आणि महाराष्ट्राच्या पुरोगामी वारशावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

घटनेनंतर लवांडे यांनी लोणी काळभोर पोलीस स्टेशन येथे धाव घेत तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत संग्राम भंडारे यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. आमदार रोहित पवार यांनी "वारकरी संप्रदायात घुसखोरी केलेल्या कट्टरतावाद्यांविरोधात विकास लवांडे आवाज उठवत होते. त्याचाच राग मनात धरून त्यांच्यावर भ्याड हल्ला करण्यात आला," असा आरोप केला. "ज्ञानोबा-तुकोबांनाही मनुवादी प्रवृत्तीने छळले होते, त्यामुळे अशा हल्ल्यांना आम्ही भीक घालणार नाही," असेही त्यांनी म्हटले आहे.

खासदार सुप्रिया सुळे यांनीही या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. "भररस्त्यात एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याला अडवून हल्ला करण्याचे धाडस कोणाच्या पाठबळावर होत आहे?" असा सवाल उपस्थित करत त्यांनी राज्याच्या गृहमंत्र्यांनी तातडीने हस्तक्षेप करून कठोर कारवाईचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली. हल्लेखोरांकडे हत्यारे असल्याचाही दावा त्यांनी केला.

तर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा उल्लेख करत संग्राम भंडारे यांच्यावर निशाणा साधला. "वारकरी संप्रदाय हा प्रेम, समता आणि नम्रतेचा मार्ग आहे, गुंडगिरीचा नाही," असे सांगत त्यांनी विकास लवांडे यांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शविला. या घटनेनंतर विविध पुरोगामी संघटना आणि राजकीय कार्यकर्त्यांकडूनही संताप व्यक्त करण्यात येत आहे. "लोकशाहीत मतभेद असू शकतात; मात्र विचार मांडणाऱ्यांवर शाईफेक, धमक्या आणि गुंडगिरी करणे ही महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेवर आघात करणारी बाब आहे," अशा प्रतिक्रिया उमटत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात विचारांना उत्तर विचारांनीच दिले पाहिजे, अशी भूमिका व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या घटनेमुळे राज्यातील राजकीय संघर्ष आता वैचारिक पातळीवरून थेट रस्त्यावर उतरल्याचे चित्र निर्माण झाले असून पोलिस प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## चाकणला स्व. गणेशभाऊ पऱ्हाड पाणपोई सुरू

चाकण (दै. संध्या)



गरजूंची तहान भागविण्यासाठी व उन्हाच्या झळायांनी व्याकुळ झालेल्या नागरिकांना पिण्यासाठी थंड आणि स्वच्छ पाणी मिळावे, हा हेतू डोळ्यासमोर ठेवून चाकण येथील माणिक चौकात कामगार नेते स्व. गणेशभाऊ पऱ्हाड पाणपोई सुरू करण्यात आली. या उपक्रमाचे नागरिकांनी जोरदार स्वागत केले. चाकण - शिक्रापूर रस्त्यावरील येथील माणिक चौकात रिक्षा थांब्यालगत ही पाणपोई सुरू करण्यात आली आहे. शिवसेनेचे पुणे जिल्हा प्रमुख रामदास धनवटे व जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश अरगडे यांच्या हस्ते या पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी कडाचीवाडीचे माजी सरपंच माऊली कड, लक्ष्मण जाधव, शिवसेनेचे खेड तालुका उपप्रमुख मंगेश पऱ्हाड, पांडुरंग कड, सुनील बोंबले, वैभव लोणारी, दीपक कुसाळकर, रामहरी आवटे, ईश्वर कोतवाल, शरद वाघुले, सागर पऱ्हाड, प्रकाश रुमाले, गोविंद सोनकांबळे, संतोष मोरे आदी उपस्थित होते. रामदास धनवटे म्हणाले," अत्यंत कडक उन्हाळ्यामध्ये चाकण पंचक्रोशीतील कोणत्याही प्रवासी रिक्षा थांब्यावर शुद्ध व थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नव्हती. याची जाणीव ठेवून युवक नेते मंगेश पऱ्हाड यांच्या प्रयत्नातून चाकण येथे पाणपोई सुरू झाली आहे." बाळासाहेब ढवळे यांनी सूत्रसंचालन केले. माऊली कड यांनी आभार मानले.

# आंब्याच्या बागेत 'केळी'चा सापळा

**पाटण्यातील शेतकऱ्याच्या देसी जुगाडाने घातक किडींचा होणार नायनाट**

बारामती (दै. संध्या)



पाटण्यातील अनुभवी शेतकरी श्री.अमरजीत कुमार सिन्हा यांनी आंबा आणि पेरूसारख्या रसाळ फळांना 'फळमाशी'च्या घातक हल्ल्यापासून वाचवण्यासाठी अत्यंत स्वस्त आणि प्रभावी देसी उपाय शोधला आहे.फळमाशीमुळे अनेकदा फळे आतून सडतात आणि बागायतदारांना ९० टक्क्यांपर्यंत मोठे नुकसान सहन करावे लागते. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून त्यांनी पिकलेल्या केळी फळ आणि टाकाऊ प्लास्टिकच्या बाटल्यांपासून एक खास 'किड सापळा' तयार केला आहे.या सापळ्याकडे फळमाशा आकर्षित होतात आणि त्यात अडकून मरतात.

आंब्याच्या बागेत फळे पक्व होण्याच्या काळात फळमाशी हा बागायतदारांचा सर्वात मोठा शत्रू ठरतो.ही छोटीशी माशी संपूर्ण पिकाचे मोठे नुकसान करू शकते. फळमाशी फळांच्या सालीला छिद्र करून आत अंडी घालते. त्यातून बाहेर पडणाऱ्या अळ्या फळ आतून सडवतात. त्यामुळे शेतकरी अनेकदा महागडी आणि विषारी कीटकनाशके फवारतात,जी माणसांच्या आरोग्यासोबतच पर्यावरणासाठीही घातक ठरतात. बिहार मधील पाटण्यातील लोदीपूर चांदमारी येथे राहणारे ६१ वर्षीय अनुभवी शेतकरी अमरजीत कुमार सिन्हा यांनी या समस्येवर एक स्वस्त आणि परिणामकारक उपाय शोधून काढला आहे.त्यांच्या ३० वर्षांच्या अनुभवातून विकसित झालेली ही पद्धत फळमाशीपासून संरक्षण देऊन रासायनिक औषधांचा वापर कमी करते आणि आंब्याची गोडी टिकवून ठेवते.

या तंत्रज्ञानाची सर्वात मोठी खासियत म्हणजे त्याची साधी पद्धत यासाठी कोणतेही विशेष कौशल्य किंवा महागडी यंत्रसामग्री लागत नाही.टाकाऊ प्लास्टिकच्या बाटल्या मधून कापून त्यामध्ये पिकलेल्या केळ्यांचा चारा ठेवला जातो.त्यात लॅमडा सायहॅलोथ्रीन/ मोनोक्रोटोफॉस औषधाचे काही थेंब मिसळले जातात.पिकलेल्या केळीचा सुगंध फळमाशांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करतो.जसे माशा त्या सापळ्यात येतात,त्या काही तासांत नष्ट होतात.हा सापळा झाडावर टांगताच काम सुरू करतो आणि एकदा तयार केलेला ट्रॅप मधीलचारा सुमारे १५ दिवस प्रभावी राहतो.

शेतीत नफा वाढवण्यासाठी खर्च कमी असणे महत्त्वाचे असते. अमरजीत यांचा हा 'बनाना ट्रॅप' त्या दृष्टीने अत्यंत फायदेशीर आहे. बाजारात मिळणाऱ्या रेडिमेड ट्रॅपसाठी प्रति हेक्टर सुमारे २००० रुपये खर्च येतो, तर या देशी पद्धतीने फक्त १०० ते १५० रुपयांत काम होते.एका एकर बागेसाठी फक्त २५ ते ३० ट्रॅप पुरेसे असतात.एका ट्रॅपची किंमत केवळ ३ ते ४ रुपये येते आणि तो ४ ते ५ झाडांसाठी उपयोगी ठरतो.या छोट्याशा गुंतवणुकीमुळे फळमाशीचा प्रादुर्भाव ९० टक्क्यांपर्यंत कमी होतो.त्यामुळे फळांची गुणवत्ता आणि चमक टिकून राहते आणि शेतकऱ्यांना बाजारात चांगला दर मिळतो.

या नवकल्पनेचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे आरोग्य आणि पर्यावरणाचे संरक्षण सामान्यतः शेतकरी संपूर्ण झाडावर कीटकनाशकांची फवारणी करतात, ज्याचा परिणाम थेट फळांवर होतो. पण या सापळा पद्धतीत विषारी औषधांचा वापर अतिशय मर्यादित प्रमाणात आणि फक्त बाटलीच्या आत केला जातो.

ही पर्यावरणपूरक पद्धत फायदेशीर कीटकांना नुकसान न पोहोचवता फक्त फळमाशीवर नियंत्रण ठेवते. ही पद्धत एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) चे उत्तम उदाहरण असून भविष्यातील शाश्वत शेतीसाठी अत्यंत उपयुक्त मानली जाते.

### विषमुक्त फळे आणि भाज्यांसाठी उपयुक्त उपाय

अमरजीत कुमार सिन्हा यांच्या या यशामुळे बागायतदार आणि भाजीपाला उत्पादकांमध्ये नवीन आशा निर्माण झाली आहे. आंबा आणि पेरूमध्ये यशस्वी ठरलेल्या या पद्धतीचा वापर आता जांभूळ सारख्या नाजूक फळांवर तसेच काकडी,भोपळा,दुधी भोपळा यांसारख्या वेलवर्गीय भाज्यांवरही करून पाहण्याची गरज आहे.जर या तंत्रज्ञानाला सरकारी स्तरावर प्रोत्साहन मिळाले आणि मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला,तर ते शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासोबतच देशात कीटकनाशकमुक्त फळ उत्पादन वाढवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकते.अमरजीत यांचा हा शोध कमी साधनांमध्येही मोठे यश मिळवता येते याचे उत्तम उदाहरण आहे.

**- संतोष गोडसे, विषय विशेषज्ञ, कृषी विज्ञान केंद्र बारामती**

## थोडक्यात पण महत्वाचे...



## विकास लवांडे यांच्यावर शाईफेक; आळंदीत राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस कडून तीव्र निषेध

आळंदी (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर आळंदी म्हातोबा येथे झालेल्या शाईफेक प्रकरणाच्या निषेधार्थ आळंदी देवाची येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांसह ग्रामस्थांनी एकत्र येत तीव्र निषेध आंदोलन केले. तथाकथित संग्राम भंडारे याने विकास लवांडे यांच्यावर शाईफेक केल्याचा आरोप करण्यात आला असून, या घटनेमुळे राजकीय वातावरण तापले आहे. संबंधित प्रकाराचा निषेध करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या निषेध आंदोलनात आळंदी शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष विलास कुराडे, आळंदी शहर काँग्रेसचे अध्यक्ष संदीप नाईकरे, संजय वडगावकर, अर्जुन मेदनकर, योगीराज सातपुते, विश्वंभर शिंदे, सुदीप गरुड यांच्यासह आळंदीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. “राजकीय मतभेद असू शकतात; मात्र अशा प्रकारच्या कृत्यांना लोकशाहीत स्थान नाही,” अशी प्रतिक्रिया काँग्रेस शहराध्यक्ष संदीप नाईकरे पाटील यांनी व्यक्त केली.



## झी टीव्हीवरील कलाकारांनी मातृदिनाच्या भावनांचा सन्मान केला!

आळंदी (दैनिक संध्या) : मातृदिन हा आईच्या निःस्वार्थ प्रेमाचा, शांत चिकाटीचा आणि आई मुलामधील अतूट नात्याचा हृदयस्पर्शी उत्सव आहे. हा दिवस आपल्याला आपल्या आयुष्याला घडवणाऱ्या मायेची ऊब, मार्गदर्शन आणि त्यागांची आठवण करून देतो. झी टीव्हीवरील भावनिक कौटुंबिक प्रवासांपासून ते सशक्त महिला केंद्रित कथांपर्यंत, आई ही कायम कथांची भावनिक कडी असते, जी ताकद आणि सौम्यतेने सगळ्यांना एकत्र बांधून ठेवते. या मातृदिनी, तुमच्या आवडत्या झी टीव्ही कलाकारांकडून आलेल्या मनापासूनच्या शुभेच्छा आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत. ‘गंगा माई की बेटियाँ’ मधील अमनदीप सिधू, ‘जाने अनजाने हम मिले’ मधील भरत अहलावत, ‘तुम से तुम तक’ मधील निहारिका चौक्सी, ‘लक्ष्मी निवास’ मधील मानसी जोशी रॉय, ‘सरू’ मधील शगुन पांडे, ‘वसुधा’ मधील प्रिया ठाकूर आणि ‘जगद्धात्री’ मधील सोनाक्षी बत्रा हे कलाकार पडद्यावर आणि पडद्यामागेही आईच्या प्रेमाचा, कृतज्ञतेचा आणि तिच्या अनमोल उपस्थितीचा उत्सव साजरा करत आहेत. झी टीव्हीवरील ‘गंगा माई की बेटियाँ’ या मालिकेत स्नेहाची भूमिका साकारणारी अमनदीप सिधू म्हणाली, “सर्वांना मातृदिनाच्या खूप खूप शुभेच्छा! लहानपणापासून मी पाहिले आहे की आई कशी हसतमुखाने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी शांतपणे पेलत असते. आज मी मोठी झाल्यावर मला खऱ्या अर्थाने समजते की मला आज मी जे आहे ते बनवण्यासाठी ती किती त्याग करत राहिली. पडद्यावर सशक्त व्यक्तिरेखा साकारणे मला नेहमीच माझ्या आईमधील ताकदीची आठवण करून देते. तिचे त्याग, तिची चिकाटी आणि तिने नेहमीच कायम आम्हांला प्रथम ठेवले ती तिची वृत्ती. माझ्यासाठी हा दिवस कृतज्ञतेचा आहे. आई दररोज करत असलेल्या त्या असंख्य छोट्या छोट्या गोष्टींचे आभार मानण्याचा, ज्या अनेकदा लक्षात येत नाहीत पण आयुष्यात खूप काही अर्थपूर्ण ठरतात.”




## चार सांघिक विजेतेपदांसह महावितरणचे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत एकतर्फी वर्चस्व

■ अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेचा समारोप

पुणे (दैनिक संध्या) : एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या वतीने आयोजित अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेत महिला पुरुष गटातील कबड्डी व खो-खो तसेच कुस्तीमध्ये महावितरणने तब्बल चार सांघिक विजेतेपद व एक उपविजेतेपद मिळवत एकतर्फी वर्चस्व राखले. बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात देशभरातली विद्युत कंपन्यांच्या तीन दिवसीय राष्ट्रीय स्पर्धेचा शुक्रवारी (दि. ८) सायंकाळी समारोप झाला. दरम्यान, महावितरणच्या कबड्डी पुरुष संघाने बलाढ्य हिमाचल प्रदेश संघाचा अटीतटीच्या अंतिम सामन्यात पराभव करीत १५ वर्षांनंतर विजेतेपदाचा मान मिळवला. या राष्ट्रीय स्पर्धेतील सर्व सांघिक व वैयक्तिक विजेत्यांना करंडक व प्रशस्तिपत्राने गौरविण्यात आले. बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संचालक (प्रकल्प) श्री. दत्तात्रेय पडळकर (महापारेषण), कोकणचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे (महावितरण), स्पर्धेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष व पुणे प्रादेशिक संचालक श्री. सुनील काकडे (महावितरण), मुख्य अभियंते सर्वश्री अनिल कोलप, दत्तात्रेय बनसोडे, धर्मराज पेठकर, स्वप्निल काटकर, अंकुर कावळे, संजय पाटील, संजय कुऱ्हाडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके व श्री. पुरुषोत्तम वारजुरकर, विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष श्री. जिग्नेश राय, सरचिटणीस श्री. नरेश कुमार, खजीनदार श्री. ललित गायकवाड, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पांडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष पाटणी, भक्ती जोशी, सोनाली बाविस्कर, स्वागती सोळंकुरे यांनी केले तर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भुपेंद्र वाघमारे यांनी मानले. पुढील वर्षापासून कुस्ती स्पर्धेसाठी महिला गटाचा समावेश करण्याचा निर्णय यावेळी नियंत्रण मंडळाच्या वतीने जाहीर करण्यात आला. कबड्डीच्या विजेतेपदाचे महावितरणकडून स्वप्न साकार – अत्यंत चुरशीच्या उपांत्य फेरीमध्ये प्रतिस्पर्धी संघावर मात करीत मागील वर्षीचा विजेता हिमाचल प्रदेश विरुद्ध महावितरण संघ यंदाही आमनेसामने आले. दोन्ही संघात राष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग असल्याने अंतिम सामन्यासाठी क्रीडा प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली. सामन्याच्या पहिल्या पाच ते सात मिनिटात हिमाचल प्रदेशने आक्रमक चढाईवर भर देत ६ विरुद्ध २ अशी आघाडी घेतली.

# पनवेलसाठी सिडकोने पाणी उपलब्ध करून द्यावे

पनवेल (दै. संध्या)

पनवेल महापालिका क्षेत्रात पाणी प्रश्न गंभीर झाला आहे. खारघर, तळोजा, कामोठे आणि कळंबोली परिसरासाठी वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत आहे. त्यामुळे सिडकोने या भागासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सिडको प्रशासनाला केली. खासदार श्रीरंग बारणे यांनी बेलापूर येथील सिडको कार्यालयात सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल व व्यवस्थापकीय उप संचालक गणेश देशमुख यांच्या समवेत मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक घेतली. पनवेल शहरातील खारघर, तळोजा, कामोठे आणि कळंबोली परिसरासाठी वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देण्याची सूचना केली. तसेच पनवेल महानगरपालिका आणि



### खासदार श्रीरंग बारणे यांचे निर्देश

सिडको संबंधित विविध प्रश्न, नागरी सुविधा आणि विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, विनोद साबळे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, अमर म्हात्रे तसेच पदाधिकारी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, पनवेल महापालिका क्षेत्रात पाणी प्रश्न गंभीर झाला आहे. खारघर, तळोजा, कामोठे आणि कळंबोली परिसरासाठी वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत आहे. या भागात सिडकोच्या परवानगीने मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभारले गेले आहेत. पनवेलमधील काही भाग सिडकोकडे होता. तो भाग आता महापालिकेत समाविष्ट झाला आहे. त्यामुळे पाण्याची समस्या सोडवण्याची मोठी जबाबदारी सिडकोची आहे. सिडकोकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे. सिडकोने अतिरिक्त पाणी पनवेल महापालिकेला द्यावे.

सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करावेत. नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यादृष्टीने कचरा संकलन, वाहतुकीचे नियोजन करावे. वाढत्या नागरीकरणामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या गरजा लक्षात घेऊन नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक सक्षम पद्धतीने उपलब्ध करून देण्यावर भर देण्याची सूचना खासदार बारणे यांनी केली.

### पनवेलच्या महापौरांशीही पाणीपुरवठ्याबाबत चर्चा

पनवेलचे महापौर नितीन पाटील यांचीही खासदार श्रीरंग बारणे यांनी भेट घेतली. पनवेल शहरातील पाणीटंचाईच्या प्रश्नासंदर्भात सविस्तर चर्चा केली. वाढती लोकसंख्या आणि उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याबाबत यावेळी विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. शहरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक नियोजन, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर आणि भविष्यातील उपाययोजनांवर सकारात्मक चर्चा झाल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले. यावेळी स्थायी समिती अध्यक्ष बबन मुकादम, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अर्जुन म्हात्रे, शिवसेना जिल्हाप्रमुख नगरसेवक रामदास शेवाळे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, कळंबोली शहरप्रमुख तुकाराम सरक, नगरसेवक चेतन भगत, हरीश केणी, सुमित झुजरराव उपस्थित होते.

## उरण येथे नागरी संरक्षण दलातर्फे प्राथमिक पाठ्यक्रम संपन्न

उरण (दै. संध्या)

महाराष्ट्र शासन गृह विभाग विशेष नागरी संरक्षण दल उरण रायगड ह्यांच्या वतीने नागरी संरक्षण प्राथमिक पाठ्यक्रम उपनियंत्रक केंद्र बोरी उरण येथे आयोजित करण्यात आला होता. यात प्रशिक्षणाचे विषय.नागरी संरक्षण दलाची आवश्यकता, उद्देश, उपाय योजना आपत्ती व्यवस्थापन अग्निशमन प्रथमोपचार नियंत्रण व संदेशवहन अडकलेल्या नागरीकांची सुटका/विमोचन CPR पध्दत कृत्रिम श्वसन पध्दती रुग्णास वाहुन नेण्याच्या पध्दती बॅन्डेज दोऱ्या व गाठींचे प्रकार, रुग्णशिबिका बाबत माहिती तसेच प्रात्यक्षिके सहित प्रक्षिशण वर्ग घेण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी शासनाचे ओळखपत्र शासकिय प्रशिक्षण प्रमाणपत्र. देशसेवेची अमुल्य संधी विभागाचे नेतृत्व करण्याची संधी नागरी संरक्षण स्वंयसेवक



सभासदत्व मिळणार आहे.

प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. नवीन राजपाल (मुख्य क्षेत्ररक्षक) ह्यांनी स्वयसेवकांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षिर्थीन मधून लीडर आफ्रिन खान हिने मनोगत व्यक्त केलं, रेश्मा खान हिने आपत्ती दरम्यान जीवितहानी, वित्तहानी कशी कमी करायची ह्या बाबत प्रशिक्षण मध्ये प्रत्यकाशिकाहित मार्गदर्शन मिळाले ह्याबाबत आनंद व्यक्त केला, मुलांमधून लीडर म्हणून इंगोले ह्यांनी जबाबदारी पार पाडली तर राजगे ह्यांनी मनोगत व्यक्त केलं तसेच क्लास मधून प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला आहे.

## विवो X300 FE चे भारतात अनावरण

■ ZEISS टेलीफोटो एक्सटेंडर जेन 2 आणि स्नॅपड्रॅगन 8 जेन 5 सह दमदार एंट्री

नवी दिल्ली (दै. संध्या)

Vivo ने आपल्या कॉम्पॅक्ट फ्लॅगशिप स्मार्टफोन मालिकेत नवीन भर घालत Vivo X300 FE हा स्मार्टफोन भारतात सादर केला आहे. प्रगत ZEISS इमेजिंग, शक्तिशाली Snapdragon 8 Gen 5 प्रोसेसर आणि आकर्षक कॉम्पॅक्ट डिझाइन यामुळे हा स्मार्टफोन प्रीमियम श्रेणीत चर्चेचा विषय ठरत आहे.

१६.०४ सेमी (६.३१-इंच) फ्लॅट डिस्प्ले, ५००० निट्स ब्राइटनेस आणि ZEISS मास्टर कलर डिस्प्ले यामुळे या श्रेणीतील भारतातील सर्वात तेजस्वी स्क्रीन असल्याचा दावा कंपनीने केला आहे. हलक्या आणि स्लिम डिझाइनसह एका हाताने सहज वापरता येईल, अशा पद्धतीने या स्मार्टफोनची रचना करण्यात आली आहे. फोटोग्राफीसाठी या स्मार्टफोनमध्ये प्रगत ZEISS इमेजिंग तंत्रज्ञान देण्यात आले आहे. यात ५० मेगापिक्सेलचा ZEISS मुख्य कॅमेरा, ZEISS मल्टीफोकल पोर्ट्रेट सपोर्ट, १००x डिजिटल झूमसह ५० मेगापिक्सेलचा ZEISS सुपर टेलीफोटो कॅमेरा आणि AI क्रिएटिव्ह सूटचा समावेश आहे. विशेष म्हणजे, २०० मिमी समतुल्य फोकल लेंथ देणारा ZEISS टेलीफोटो एक्सटेंडर जेन २ देखील उपलब्ध करण्यात आला आहे. परफॉर्मन्ससाठी Snapdragon 8 Gen 5 प्रोसेसर देण्यात आला असून, ६५०० mAh क्षमतेची मोठी बॅटरी ९०W वायर्ड फ्लॅशचार्ज आणि ४०W वायरलेस फ्लॅशचार्जला सपोर्ट करते.




Vivo X300 FE हा स्मार्टफोन Urban Olive, Lilac Purple आणि Noir Black या तीन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध होणार आहे. Vivo X300 FE च्या १२GB + २५६GB व्हेरिएंटची किंमत ७९,९९९ रुपये, तर १२GB + ५१२GB व्हेरिएंटची किंमत ८९,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. याशिवाय, Vivo ZEISS टेलीफोटो एक्सटेंडर जेन २ ची किंमत १५,९९९ रुपये असून, ॲक्सेसरी किटची किंमत ३,९९९ रुपये आहे.

हा स्मार्टफोन १४ मे २०२६ पासून Flipkart, Amazon India, Vivo India ई-स्टोअर तसेच देशभरातील प्रमुख रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध होणार आहे.

कंपनीकडून निवडक बँक कार्डांवर १० टक्के इन्स्टंट कॅशबॅक, २४ महिन्यांचा नो-कॉस्ट EMI, झिरो डाउन पेमेंट सुविधा, ५,००० रुपयांपर्यंत अपग्रेड बोनस, एक वर्षाची मोफत विस्तारित वॉरंटी आणि जिओकडून ५०००GB डेटा लाभ देण्यात येत आहे. याशिवाय, ‘V Shield’ वर ६० टक्के सूट आणि ७० टक्क्यांपर्यंत खात्रीशीर बायबॅकची सुविधाही ग्राहकांना मिळणार आहे.

Vivo इंडियाचे एक्स सिरीज प्रॉडक्ट मॅनेजमेंट प्रमुख Vikas Tagra यांनी सांगितले की, “आजचे ग्राहक उत्कृष्ट परफॉर्मन्ससोबत स्टायलिश आणि सहज वापरता येईल असा स्मार्टफोन शोधत आहेत. Vivo X300 FE मध्ये आधुनिक डिझाइन, प्रगत ZEISS इमेजिंग आणि फ्लॅगशिप परफॉर्मन्सचा उत्कृष्ट मिलाफ करण्यात आला आहे.”

## चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते अभय भुतडा फाउंडेशन प्रस्तुत अल्टिमेट पिकलबॉल लीगचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)

पुण्यात आज ‘अल्टिमेट पिकलबॉल लीग पुणे एडिशन २०२६’चे उद्घाटन झाले. महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण तसेच संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी टॅब ग्लोबल व्हेंचर्स आणि अभय भुतडा फाउंडेशनचे संस्थापक व अध्यक्ष सीए अभय भुतडा उपस्थित होते.

अभय भुतडा फाउंडेशन प्रस्तुत या दोन दिवसीय स्पर्धेमुळे खेळाडू, आयोजक आणि क्रीडाप्रेमी एकाच व्यासपीठावर एकत्र आले आहेत.




पुण्यातील मसलबार स्पोर्ट्स क्लब येथे आयोजित या लीगमध्ये देशभरातील १८० हून अधिक खेळाडू १२ संघांमधून सहभागी झाले आहेत. पुरुष आणि महिला एकेरी-दुहेरी तसेच मिश्र दुहेरी प्रकारांमध्ये सामने खेळवले जाणार असून, देशात पिकलबॉल या क्रीडाप्रकाराची वाढती लोकप्रियता यातून अधोरेखित होत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

उद्घाटन समारंभात बोलताना महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण तसेच संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, “अल्टिमेट पिकलबॉल लीगसारख्या क्रीडा स्पर्धांमुळे खेळाडू, युवा खेळाडू आणि क्रीडाप्रेमींना एकाच व्यासपीठावर येण्याची संधी मिळत आहे, ही निश्चितच आनंदाची बाब आहे. फिटनेस, समुदाय सहभाग आणि सकारात्मक क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमासाठी आयोजक आणि अभय भुतडा फाउंडेशनचे अभिनंदन करतो. विशेषतः तरुणांमध्ये शिस्त, संघभावना आणि निरोगी जीवनशैली विकसित करण्यासाठी खेळाची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. स्पर्धेतील सर्व सहभागी खेळाडूंना शुभेच्छा देतो आणि ही स्पर्धा पुढेही क्रीडा आणि सक्रिय जीवनशैलीबाबत अधिक जागरूकता निर्माण करेल, अशी आशा व्यक्त करतो.”


टॅब ग्लोबल व्हेंचर्स आणि अभय भुतडा फाउंडेशनचे संस्थापक व अध्यक्ष सीए अभय भुतडा म्हणाले, “अल्टिमेट पिकलबॉल लीगचे उद्घाटन करून सहभाग आणि क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांना पाठबळ दिल्याबद्दल आम्ही चंद्रकांत दादा पाटील यांचे आभारी आहोत. क्रीडा, समुदाय सहभाग आणि युवा सहभागाच्या माध्यमातून सकारात्मक सामाजिक परिणाम घडवणाऱ्या उपक्रमांना पाठबळ देण्याची आमची भूमिका कायम आहे. अल्टिमेट पिकलबॉल लीगसोबत भागीदारी करताना आणि खेळाच्या माध्यमातून लोकांना एकत्र आणणाऱ्या व्यासपीठाला समर्थन देताना आम्हाला आनंद होत आहे.

# चाकण एमआयडीसीत बिबट्याची दहशत

## सॅनी हेवी व मर्सिडीज बेंझ परिसरात सलग एन्ट्री : औद्योगिक परिसरात बिबट्या दिसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये भीती

चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील चाकण एमआयडीसी परिसरातील दोन बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आवारात बिबट्याचा वावर आढळल्याने औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. सॅनी हेवी इंडस्ट्रीज आणि मर्सिडीज बेंझ या नामांकित कंपन्यांच्या परिसरात सलग दोन दिवस बिबट्या दिसून आल्याने कामगार व कर्मचारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.



धक्कादायक बाब म्हणजे कंपनीच्या उत्पादन विभागाजवळील आतील परिसरातही बिबट्याचा मुक्त वावर दिसून आल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. वन विभागाने परिसरात शोधमोहीम सुरू केली असून, बिबट्याच्या हालचाली दिसलेल्या ठिकाणी दोन पिंजरे लावण्यात आले आहेत. गुरुवारी (दि. 7) सॅनी हेवी इंडस्ट्रीजच्या आवारात, तर शुक्रवारी (दि. 8) सकाळच्या सुमारास मर्सिडीज बेंझ कंपनीच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या फिरताना दिसून आला.

घटनेची माहिती मिळताच कंपनी प्रशासनाने तातडीने वन विभागाशी संपर्क साधला. त्यानंतर वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र, पहिल्या दिवशी बिबट्याचा ठावठिकाणा लागला नाही. यानंतर पुन्हा त्याच परिसरात तसेच मर्सिडीज बेंझ कंपनीच्या आवारात बिबट्या दिसल्याची माहिती समोर आली. कंपनी प्रशासनाने कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना देत अनावश्यक गर्दी टाळण्याचे आवाहन केले आहे. शुक्रवारी वन विभागाने पुन्हा परिसराची पाहणी केली. परिसरात दोन पिंजरे लावण्यात आल्याची माहिती चाकण वन विभागाचे संतोष कंक यांनी दिली.

भक्ष्याच्या शोधात जवळील डोंगराळ भागातून किंवा झाडीतून बिबट्या एमआयडीसी परिसरात शिरल्याची शक्यता वन विभागाने व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे 4 वर्षांपूर्वी, 21 मार्च 2022 रोजी पहाटे मर्सिडीज बेंझ कंपनीत बिबट्या शिरला होता. त्यावेळी चाकण वनविभाग, बचाव पथक आणि माणिकडोह बिबट निवारा केंद्राच्या रेस्क्यू टीमने सुमारे 5 तासांच्या प्रयत्नांनंतर बिबट्याला जेरबंद केले होते.

### बिबट्या नेमका आला कुठून?

एमआयडीसी परिसरात आढळलेला बिबट्या आळंदी फाटा परिसरातील वनहद्दीतून किंवा कुरुळी-निघोजे भागातील शेती परिसरातून आला असावा, असा अंदाज वन विभागाने व्यक्त केला आहे. मात्र, तो नेमका कोणत्या मार्गाने कंपन्यांच्या आवारात पोहोचला, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी चंद्रकांतदादा पाटलांचे पाऊल

■ स्वतःचे 'SIR मॅपिंग' पूर्ण करत नागरिकांना केले आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी आज स्वतःचे SIR (Special Intensive Revision) मॅपिंग आज कोथरुड मध्ये पूर्ण केले. मतदार यादी अद्ययावत करण्याच्या या प्रक्रियेत स्वतः सहभाग नोंदवून, त्यांनी पुणेकर आणि राज्यातील नागरिकांसमोर एक आदर्श ठेवला आहे. मतदार यादीतील पारदर्शकता आणि अचूकता वाढवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार SIR मॅपिंग मोहीम राबवली जात आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपल्या मतदार ओळखपत्रातील माहितीची पडताळणी करून, हे मॅपिंग यशस्वीपणे पूर्ण केले. यामुळे त्यांची मतदार यादीतील माहिती आता पूर्णपणे सुरक्षित आणि अद्ययावत झाली आहे. "लोकशाहीत मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी मतदार यादीत आपले नाव अचूक असणे आवश्यक आहे. मी माझे SIR मॅपिंग पूर्ण केले आहे, आता आपली बारी आहे. दुबार नावे टाळण्यासाठी आणि मतदार यादीतील गोंधळ कायमचा दूर करण्यासाठी सर्व नागरिकांनी तातडीने आपले मॅपिंग पूर्ण करावे." असे आवाहन ना. पाटील यांनी सर्व मतदार बांधवांना केले.

## सासवड उपबाजारात ज्वारीला प्रतिक्विंटल 4 हजार दर

सासवड (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील निरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सासवड (ता. पुरंदर) येथील उपबाजारात धान्याची मोठ्या प्रमाणात आवक होते. बुधवारी (दि. 6) ज्वारीला प्रतिक्विंटलला सर्वाधिक 4 हजार रुपयांचा दर मिळाल्याची माहिती निरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे यांनी दिली. सासवड उपबाजारात माळशिरस, राजुरी, वाघापूर, वाल्हा, गराडे, परिंचे, वीर, दिवे यांसह संपूर्ण पुरंदर, बारामती, इंदापूर, भोर, दौंड अशा विविध भागातून ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा असे धान्य विक्रीसाठी येते. बुधवारी सासवड उपबाजारात एक नंबर प्रतीच्या ज्वारीला कमाल 4 हजार रुपये, तर दोन नंबर प्रतीच्या ज्वारीला किमान 3 हजार रुपये, तर सरासरी 3 हजार 500 हजार रुपये प्रतिक्विंटल असा दर मिळाला, असे निरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव मिलिंद जगताप यांनी सांगितले. या वेळी सभापती संदीप फडतरे, उपसभापती बाळासो शिंदे, संचालक शरद जगताप, महादेव टिळेकर, वामनभाऊ कामठे, गणेश होले, अशोक निगडे, शरयू वाबळे, भाऊसाहेब गुलदगड, देविदास कामठे, सुशांत कांबळे, पंकज निलाखे, अनिल माने, संचालिका शहजान शेख, लिपीक विकास कांबळे यांसह व्यापारी आर. के. ट्रेडर्सचे रूपचंद कांडगे, आर. आर. ट्रेडर्सचे राजेंद्र जळिंद्रे, सत्यवान पवार, जितेंद्र महाजन, अविनाश महाजन, नंदकुमार महाजन, शैलेश विरकर आदी उपस्थित होते. यासह मंगळवारी (दि. 5) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निरा बाजारात गुळाची आवक 550 बॉक्स म्हणजेच 100 क्विंटल असल्याची माहिती गुळबाजाराची माहिती सहसचिव नितीन किकले, कृष्णात खलाटे, प्रवीण कर्णवर यांनी दिली. या वेळी गूळ व्यापारी शांतिकुमार कोठडिया उपस्थित होते.

## इंदापूरला चिंचेचे मुबलक उत्पादन अपेक्षित

बावडा (दैनिक संध्या) : इंदापूर तालुक्यामध्ये सध्या पोषक हवामानामुळे चिंचेची झाडे फुलोऱ्याने बहरली आहेत. ही झाडे पिवळसर-गुलाबी फुलांनी अक्षरशः लगडून गेली आहेत. त्यामुळे यंदा चिंचेचे मुबलक प्रमाणावर उत्पादन होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. इंदापूर तालुक्यात अनेक ठिकाणी चिंचेच्या बागा आहे. तसेच, शेतात बांधावर, घरापुढे, रस्त्यांच्या दुतर्फा चिंचेची झाडे हमखास दिसून येतात. शहाजीनगर येथील निरा-भीमा कारखाना परिसरातही अनेक चिंचेची झाडे आहेत. ही झाडे सध्या दाट फुलोऱ्याने लक्षवेधी दिसत आहेत. निसर्गाचे सुंदर रूप पाहायला मिळत आहे, असे कारखान्याचे कार्यकारी संचालक नवनाथ सपकाळ यांनी नमूद केले. उन्हाळ्यामध्ये चिंचेच्या झाडांना आलेल्या जोमदार फुलांनी ग्रामीण परिसर आकर्षक दिसत आहे. शेतात शिवारामध्ये चिंचेच्या झाडांच्या फुलांमुळे मधमाश्या तसेच पक्ष्यांची वर्दळ वाढली असून, पर्यावरण संतुलनासाठीही त्याचा फायदा होत आहे. येत्या काही दिवसांनंतर या फुलांपासून चिंचेची फळधारणा सुरू होणार असल्याने यंदा चिंचेचे उत्पादन चांगले येण्याची शक्यता निरा-भीमा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक धनंजय कोरटकर, एस. टी. मुलाणी, दादासाहेब कोळी यांनी व्यक्त केली. चिंच हे ग्रामीण भागातील महत्त्वाचे "नगदी" फळ आहे. चिंच विक्रीतून अनेकांना रोजगार उपलब्ध होतो. चिंचा फोडण्यापासून ते चिंचोक्यांपर्यंत प्रत्येक गोष्टीला बाजारात मागणी व चांगला भाव मिळतो, असे निरा-भीमा कारखान्याचे संचालक महेशकुमार शिर्के (वडापुरी) यांनी सांगितले.

## पुणे-मुंबई 'मिसिंग लिंक'मुळे खंडाळा घाटातील कोंडी इतिहासजमा

लोणावळा (दैनिक संध्या) : मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख शहरांना जोडणाऱ्या प्रवासात मोठा अडथळा ठरणाऱ्या खंडाळा घाटातील जीवघेणी वाहतूक कोंडी आता कायमस्वरूपी सुटण्याची चिन्हे दिसत आहेत. महाराष्ट्र शासनाने खालापूर ते लोणावळादरम्यान विकसित केलेल्या 'मिसिंग लिंक'चे 1 मे रोजी लोकार्पण करण्यात आले असून, गेल्या आठवडाभरापासून या मार्गामुळे खंडाळा घाटातील वाहतूक कोंडी अक्षरशः इतिहासजमा झाल्याचे दिसून येत आहे. या नवीन मिसिंग लिंकमुळे खंडाळा घाटातील अवघड चढ-उतार पूर्णपणे टाळणे शक्य झाले आहे. पूर्वी खालापूर ते लोणावळा हे अंतर पार करण्यासाठी प्रवाशांना मोठा वेळ लागत असे, मात्र आता हा प्रवास केवळ 7 ते 8 मिनिटांत पूर्ण होत आहे. गेल्या आठवडाभराच्या निरीक्षणात असे दिसून आले की, खंडाळा घाटात कुठेही वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या नाहीत. सध्या या मार्गावरून अवजड वाहनांची वाहतूक सुरळीत सुरू असून, प्रवासी वाहनांची संख्या तुलनेने कमी असली तरी, बहुतांश पर्यटक 'मिसिंग लिंक'च्या सुसाट प्रवासाला पसंती देत आहेत. यामुळे वाहनांच्या इंधनाची बचत होत असून, इंजीनवर येणारा लोडही कमी झाला आहे. एकूणच, 'मिसिंग लिंक'मुळे मुंबई-पुणे प्रवास अधिक सुरक्षित आणि वेगवान झाला असला, तरी लोणावळ्यातील पर्यटन व्यवसायाला आता बदलत्या प्रवासाच्या पद्धतीनुसार स्वतःला अनुकूल करून घ्यावे लागणार आहे. सकारात्मक परिणाम : या नवीन बदलाचे लोणावळ्यातील पर्यटन आणि व्यापारी क्षेत्रावर संमिश्र परिणाम पाहायला मिळत आहेत. खंडाळा घाट आणि लोणावळा शहरातील दुहेरी वाहतूक कोंडीला कंटाळून अनेक पर्यटकांनी लोणावळ्याकडे पाठ फिरवली होती. आता कोंडीची समस्या सुटल्यामुळे हे पर्यटक पुन्हा एकदा लोणावळ्यातील पर्यटन स्थळे पाहण्यासाठी आणि प्रसिद्ध चिक्की खरेदीसाठी शहरात येतील, असा विश्वास स्थानिक व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. नकारात्मक परिणाम : दुसरीकडे, लोणावळा हे मुंबई-पुणे प्रवासात जेवण आणि अल्पोपहारासाठी हक्काचे ठिकाण होते.

# सासवडच्या वीर पाणी योजनेवर जनरेटर कार्यान्वित

सासवड (दै. संध्या)

सासवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या 'वीर धरण पाणीपुरवठा योजने'वर वारंवार होणारा खंडित वीजपुरवठा आणि त्यामुळे विस्कळीत होणारे जलनियोजनाचे चक्र आता थांबणार आहे. या समस्येवर कायमस्वरूपी पर्याय म्हणून शनिवारी (ता. ९) ७५० केव्ही क्षमतेचा जनरेटर बसविण्यात आला. यामुळे शहराचा पाणीपुरवठा आता सुरळीत राहणार आहे. वीर धरण योजनेची जॅकवेल सातारा जिल्ह्यात येते, तर पाणी पुरंदर तालुक्यातील कांबळवाडी पंप हाऊसपर्यंत आणले जाते. तेथून पुन्हा उपसा करून पाणी पांगारे घाटमाथ्यावरील टाकीत साठवले जाते आणि तिथून सायफन पद्धतीने सासवडपर्यंत पोहोचते. या दरम्यान, सातारा आणि पुणे या दोन्ही जिल्ह्यांतील वीज कपातीच्या वेळा वेगवेगळ्या असल्याने भारनियमन झाल्यापासून अडचण निर्माण होते. त्यात गराडे आणि घोरवडी पाझर तलावातील पाणी बंद झाल्याने शहराची दररोजची १ कोटी लिटर पाण्याची गरज पूर्णपणे वीर योजनेवर अवलंबून आहे.

याबाबत पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे यांनी, या योजनेवर २४० अश्वशक्तीचे तीन पंप कार्यरत आहेत. त्यापैकी एका अतिरिक्त पंपाला हा ७५० केव्हीचा जनरेटर जोडण्यात आला आहे. आता महावितरणचा वीजपुरवठा खंडित झाला तरीही जनरेटरच्या साहाय्याने उपसा सुरू राहील असे सांगितले.

याबरोबरच सासवडच्या पाणीपुरवठ्याला अधिक सक्षम करण्यासाठी आगामी काळात वीर योजनेवर वीज बिलात बचत आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सौर ऊर्जा संच बसविण्यात येणार आहेत. तसेच पांगारे घाटमाथ्यावरील साठवण टाकीजवळ २०० एमएलडी क्षमतेचा साठवण तलाव उभारणार असून यामुळे आपत्कालीन स्थितीतही पाण्याचा तुटवडा जाणवणार नाही., असेही गिरमे यांनी सांगितले.

याप्रसंगी नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, गटनेते अजित जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, आरोग्य सभापती राजन जगताप, प्रदीप राऊत, मयूर चौखंडे, महिला बालकल्याण सभापती प्रियांका साकेत जगताप, उपसभापती लिना सौरभ वढणे, स्मिता सुहास जगताप, तसेच सुहास जगताप, ॲड. सौरभ वढणे, साकेत जगताप, पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी हनुमंत जाधव आदी उपस्थित होते.



वीर धरण : सासवड शहराच्या पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेलवर जनरेटर बसविण्यात आला. पाहणी करताना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप व नगरसेवक.

## मदनवाडी तलावातील साठा खालावला; शेतकऱ्यांची चिंता वाढली

भिगवण (दै. संध्या)

सन 1952 मध्ये निर्मिती झालेल्या मदनवाडी तलावात आधीच गाळाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात झाले आहे. दुसऱ्या बाजूने तलावाला अतिक्रमणाचा विळखा पडल्याने पाणी साठवणक्षमता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. त्यातच आता तलावातील पाणी मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढू लागली आहे. पिण्याचे पाणी व शेतीसिंचनाला मदनवाडी तलाव हा परिसराला वरदान ठरला आहे. गेल्या वर्षी मे महिन्याच्या 1 ते 3 तारखेला प्रचंड अतिवृष्टी होऊन तलाव पूर्णक्षमतेने भरला होता. परंतु, या तलावावर बेकायदा उपसा सिंचन वाढल्याने पाण्याचा बेफाम उपसा सुरू आहे. पूर्वी या तलावाला खडकवासला कालव्याचे आवर्तन मिळायचे; मात्र अलिकडे ते बंद झाले आहे. त्यामुळे केवळ पावसाच्या पाण्यावरच याचे भविष्य उभे आहे. या तलावावर मदनवाडी तसेच निंबोडी, शेटफळगढे, पिंपळे अगदी स्वामी चिंचोलीपर्यंतची शेती ओलिताखाली येते. विविध कारणांनी पाणी साठवणक्षमता कमी व उपशाचे प्रमाण अधिक प्रमाणात वाढल्याने 170 हेक्टर जलक्षेत्र असूनही एप्रिल व मे महिन्यात पाण्याची टंचाई जाणवू लागते. अगदी महिना-दोन महिन्यांसाठी उभी पिके जळण्याचा धोका वाढतो. सध्या या तलावातील पाणीसाठा खालावला असून, अंदाजे महिनाभर टिकेल एवढा साठा उपलब्ध आहे. या तलावातील वाढलेल्या गाळाचे प्रमाण लक्ष्यात घेऊन भारत फोर्ज, बारामती ॲग्रो, रोटरी क्लबच्या वतीने काही प्रमाणात गाळ काढण्याचा प्रयत्न झाला; मात्र तलावाची क्षमता लक्षात घेता तो तोकडा पडला आहे. त्यामुळे तलावातील गाळ काढून वाढलेली अतिक्रमणे काढली तरी तलावातील पाणीसाठा वर्षभर टिकण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## सौ. लिलावती रिखवलाल शहा कन्या विद्यामंदिराचा निकाल ९६.७० टक्के









### वैभवी भुजबळ केंद्रात व वर्गात प्रथम

नीरा (दै. संध्या)

नीरा (ता. पुरंदर) येथील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. लिलावती रिखवलाल शहा कन्या विद्यामंदिर या विद्यालयाने एसएससी फेब्रुवारी/मार्च 2025-26 परीक्षेत घवघवीत यश संपादन करत 96.70 टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या यशामुळे विद्यार्थिनी, पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यालयातून 90 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या 8 विद्यार्थिनींनी विशेष यश संपादन केले. यामध्ये कु. वैभवी प्रमोद भुजबळ हिने 95.40 टक्के गुण मिळवत नीरा केंद्रात व विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. कु. अदिती किरण वावरे हिने 94 टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. तर कु. प्रांजल प्रकाश गार्डी आणि कु. ईश्वरी दिनेश मानमोडे यांनी प्रत्येकी 92.80 टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. विद्यालयातील 37 विद्यार्थिनींनी विशेष प्राविण्य प्राप्त केले असून 34 विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. तसेच 12 विद्यार्थिनी द्वितीय श्रेणीत तर 5 विद्यार्थिनी पास श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. या यशाबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, स्कूल कमिटी सदस्य आणि पालकवर्ग यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. विद्यालयाच्या प्रगतीसाठी मार्गदर्शन व प्रेरणा देणाऱ्या सौ. चित्राताई शहा, सौ. रेखाताई चव्हाण, सौ. रेणुकाताई कोठडीया तसेच लक्ष्मणराव चव्हाण, रामदास राऊत विद्यार्थ्यांची तयारी करुन घेण्यात यांनीही चांगली मदत आणि प्रोत्साहन दिले होते. याबाबत त्यांचचेही विशेष कौतुक करण्यात येत आहे.

विद्यालयाच्या या उज्ज्वल यशामुळे निरा परिसरात आनंदाचे वातावरण असून विद्यार्थिनींच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिल्हापरिषदेचे माजी सभापती दत्ता चव्हाण, रेखा चव्हाण, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विराज काकडे,पंचायत समितीचे माजी उपासभापती गोरखनाथ माने,माजी सरपंच तेजश्री ककडे मा. उपसरपंच राजेश काकडे, दिपक काकडे, कुमार मोरे, कल्याण जेधे, सुदाम बंडगर, बाळासाहेब भोसले माजी ग्रामपचायत सदस्य अनिल चव्हाण, प्रमोद काकडे, यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## तीर्थक्षेत्र आदर्श बस्तीगावचे बुजुर्ग नेतृत्व महादेव उर्फ अण्णा गोरडे यांचे निधन

नारायणगाव (दै. संध्या)

तीर्थक्षेत्र आदर्श गाव बस्ती तालुका जुन्नर येथील बस्ती गावचे बुजुर्ग नेतृत्व माजी आदर्श सरपंच महादेव शंकर गोरडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

महादेव शंकर गोरडे हे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक धार्मिक क्षेत्रामध्ये ते अग्रेसर होते. जुन्या पिढीतील सहकार महर्षी कै. शिवाजीराव काळे विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक माजी खासदार कै.निवृत्तीशेठ शेरकर यांच्या बरोबरीने अनेक वर्ष जुन्नर तालुक्याच्या विकासामध्ये त्यांचे योगदान राहिले आहे.जुन्नर तालुक्याचे कार्यसम्राट आमदार स्वर्गीय वल्लभशेठ बेनके यांच्या खांद्याला खांदा लावून तालुका जुन्नर तालुक्यात राजकीय क्षेत्रात त्यांचा नावलौकिक होता. तसेच जुन्नर तालुका कृषी मार्केट समितीत, विविध कार्यकारी सोसायटी सावरगाव या स्थानिक स्वराज्य संस्थेत सुद्धा काही वर्ष ते कार्यरत होते.तीर्थक्षेत्र आदर्श गाव बस्ती येथील ग्रामदैवत श्री गुरुदत्त



महाराज, हनुमान मंदिर, मुक्ताबाई मंदिर या धार्मिक कार्यक्रमामध्ये ते अग्रेसर असत त्यांच्या नियोजनाने गुरुदत्त महाराजांचा सप्ताह किंवा हनुमान जयंती ही मोठ्या दिमाखात साजरी केली जात होती.

सालाबाद प्रमाणे बस्ती गावच्या पीर साहेबांची यात्रा करताना मानाची काठी सजवण्यापासून ते रात्रीची मिरवणुकीपर्यंत ते सर्व गावातील तरुणांपासून ते म्हाताऱ्यापर्यंत यांना एकत्रित करून गावची यात्रा अतिशय नियोजनबद्ध साजरी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता .बस्ती गावातील लग्नकार्य , आनंदाचे कार्यक्रम किंवा दुःखाच्या कार्यक्रमात ते सर्वांच्या पुढे असून शेवटपर्यंत ते नेतृत्वाचा कार्यभार ते करत असत. बस्ती गावच्या बैलगाडा शर्यती ते अग्रभागी राहून त्यांच्या स्वतःचा प्रसिद्ध बैलगाडा होता. जुन्नर तालुक्याच्या परिसरात अनेक वेळा त्यांचा बैलगाडा प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला होता.

जुन्नर तालुक्यातील राजकीय क्षेत्राप्रमाणे ज्याप्रमाणे त्यांचे संबंध होते .त्याप्रमाणे वारकरी संप्रदायाचा त्यांचा फार मोठा जवळचा निकटचा संबंध होता. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार गाथा मंदिराचे सर्वेसर्वा ह. भ. प. पांडुरंग महाराज घुले , कै.रामदास महाराज मनसुक, दुबे महाराज,धोंडकर महाराज, ज्ञानेश्वर माऊली खिल्लारी महाराज अशा दिग्गज सांप्रदायातील महाराजांच्या ते सानिध्यात सतत होते.

बस्तीगाव ग्रामपंचायतचे आदर्श सरपंच म्हणून त्यांनी कार्यकाल त्यांचा पूर्ण केला होता. गावातील भौतिक सुधारणा करण्यामध्ये हे सातत्याने गावच्या कारभारामध्ये ते अग्रेसर होते. तीर्थक्षेत्र आदर्श गाव बस्तीचे बुजुर्ग मार्गदर्शक महादेव शंकर गोरडे यांच्या निधनाने गावच्या विकासाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

जिल्हा परिषद सदस्य गुलाबशेठ पारखे, शिवसेना नेते विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक रोहिदास गोरडे, सरपंच प्रकाश गिदे,मा.सरपंच तानाजी शेलार, वाशी मार्केटचे भाजीपाल्याचे प्रसिद्ध व्यापारी दत्ताशेठ लोखंडे, भाजीपाल्याचे व्यापारी अनिलशेठ लोखंडे,लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महाराष्ट्र शासन समाजभूषण पुरस्कार्थी प्रा.काशिनाथ आल्हाट, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.उत्तम शेलार,माजी सरपंच सुभाषशेठ शेलार, तंटामुक्तीचे अध्यक्ष गोरख जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष गुलाबराव गोरडे, बस्तीगावचे पोलिस पाटील राजेंद्र रोकडे, प्रगतिशील शेतकरी चंद्रकांत गोरडे, शिवाजी चासकर, ज्ञानेश्वर कोळसे आदी मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

## खेड शिवापूर टोल नाक्याजवळ टँकरच्या धडकेत दाम्पत्याचा जागीच मृत्यू

### संतप्त नागरिकांकडून टँकरची तोडफोड

पुणे (दै. संध्या)

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील खेड शिवापूर टोल नाक्याजवळ शुक्रवारी (दि.८) दुपारी झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला. गॅस टँकरने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ही दुर्घटना घडली. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, वारजे माळवाडी (पुणे) येथील राजेंद्र बबन मोरे (वय ५५) व सविता राजेंद्र मोरे (वय ४२) हे दुचाकी (एमएच १२ एफएच ४६९६) वरून साताऱ्याकडे जात होते. खेड शिवापूर टोल नाक्याच्या पाठीमागील सातारा लेनवर आले असता गॅस टँकर क्रमांक एपी ०३ टीई ५७५९ याने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दोघेही टँकरखाली ओढले गेले आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, टँकर आणि दुचाकी दोन्ही वाहने वेगात होती. टँकर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. धडकेनंतर दुचाकी रस्त्याच्या कडेला दूरपर्यंत फेकली गेली होती.

घटना घडताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेत पोलिसांना माहिती दिली. मात्र, गंभीर दुखापतींमुळे दाम्पत्याचा जागीच मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. अपघातानंतर परिसरात मोठी गर्दी झाली होती. संतप्त नागरिकांनी गॅस टँकरची तोडफोड केल्याची माहिती समोर आली असून काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# कोपर्डे हवेली : अतिक्रमणाच्या विळख्यात गुदमरली विद्यानगरी

### पदपथासह रस्ता व्यावसायिकांच्या ताब्यात; संबंधित विभागाचे दुर्लक्ष

कोपर्डे हवेली (दै. संध्या)

कऱ्हाडची विशेष ओळख असलेली विद्यानगरी सध्या अतिक्रमणांच्या विळख्यात सापडली आहे. रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमणामुळे नागरिक, विद्यार्थी आणि वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. वाढत्या गर्दीमुळे या परिसरात अपघाताचा धोका निर्माण झाला असून, सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे गांभीर्याने का पाहात नाही? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

शिक्षणाचं माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विद्यानगरमध्ये प्ले हाऊसपासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व सुविधा उपलब्ध आहेत. शिक्षणासोबत रोजगाराच्या संधी असल्याने अनेक कुटुंबे येथे वास्तव्यास आहेत. परिणामी, दिवसेंदिवस लोकसंख्या आणि वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. कऱ्हाड- कोरेगाव हा प्रमुख मार्गही याच भागातून जात असल्याने दिवसभर मोठी वाहतूक सुरू असते.

वाढती लोकसंख्या आणि वाहतूक लक्षात घेऊन माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कार्यकाळात कृष्णा कॅनॉल ते बनवडी फाटा या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यात आले होते. पादचाऱ्यांसाठी दोन्ही बाजूंना फुटपाथची सुविधा देखील उभारण्यात आली होती. मात्र, कालांतराने या फुटपाथवर अतिक्रमण झाले. परिसरातील काही व्यावसायिक, हातगाडे चालक आणि छोटे विक्रेते यांनी फुटपाथसह रस्त्याचाही काही भाग व्यापला आहे.

विशेषतः फास्ट फूड व्यावसायिकांनी थेट रस्त्यावर हातगाडे उभे करून व्यवसाय सुरू केल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे.




या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कारवाई करून अतिक्रमण हटविण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. अन्यथा विद्यानगरीतील वाहतूक समस्या आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शाळा आणि महाविद्यालये भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होते. त्यात चारचाकी, दुचाकी आणि सायकलींची वाढलेली संख्या यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. पायी चालणाऱ्यांनाही मोठी कसरत करावी लागत आहे.